- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

सोने-चांदी
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, २३ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २८४ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# मराठवाड्यात दुष्काळाची ५० वर्षातील सर्वात भीषण स्थिती

**वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर**

राज्यात बऱ्याच भागात यंदा पाऊस चांगला झाल्याचा दावा केला जात असला तरी मराठवाडा आणि विदर्भाकडे पावसाळ्याच्या सुरुवातीपासून पावसाने पाठ फिरविली. आधून-मधून जेमतेम पाऊस झाला. त्यामुळे पिके वाढली. परंतु पिके ऐन फुलोऱ्यात असतानाच पाऊस गायब झाला. त्यामुळे पिके वाढली तरी सोयाबीनच्या शेंगांची वाढच झाली नाही. बऱ्याच ठिकाणी तर जागेवरच पिके करपली. त्यामुळे संपूर्ण खरीप हंगामच धोक्यात आला आहे.



आता या दुष्काळाची तुलना १९७२ च्या दुष्काळाशी केली जात आहे. परंतु यंदा त्यापेक्षा भीषण स्थिती आहे. कारण आता शेतीखर्च प्रचंड वाढला आहे. अशा स्थितीत एकही हंगाम हातातून गेल्यास शेतकरी अभूतपूर्व संकटात सापडण्याचा धोका आहे.

त्यामुळे चिंता अधिक वाढली आहे. १९७२ चा दुष्काळही भीषण होता. त्यावेळी अन्नधान्याची मारामार असल्याने खडी फोडून कामाच्या मोबदल्यात सुकडी खावून लोक जगले. त्यावेळीही असाच उशिरा पाऊस आला होता.

त्यामुळे शेतीपिके हाती लागली नव्हती. उशिरा पाऊस झाल्यावर झाडपाला खाऊन वेळ निभावून न्यावी लागली. परंतु त्यावेळी शेती खर्च जेमतेम होता. त्या तुलनेत आता शेती खर्च प्रचंड वाढला आहे. मिळणाऱ्या उत्पन्नाच्या आशेने शेतकऱ्यांनीही शेतीची मशागत आणि पेरणी, कोळपणीसह खत, किटकनाशक औषधीसाठी प्रचंड खर्च केलेला आहे. परंतु खरीप पिकेच करपून गेल्याने आता शेतकऱ्यांना अभूतपूर्व संकटाचा सामना करावा लागत आहे. त्यातच अद्याप मोठा पाऊसच झाला नसल्याने नद्या, ओढे, प्रकल्प कोरडेठाक पडत आहेत. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही अत्यंत गंभीर बनण्याची चिन्हे आहेत.

१९७२ चा दुष्काळ अनुभवलेल्या ज्येष्ठ शेतकऱ्यांच्या मते त्यावेळी पाऊस कमी होता. त्यामुळे पेरण्या उशिरा झाल्या होत्या. त्यानंतर चांगला पाऊस झाला. त्यामुळे त्यावेळी पाण्याची टंचाई नव्हती. सर्वत्र पाणी उपलब्ध होते. परंतु अन्नधान्याची टंचाई होती. त्यामुळे शेतात येणाऱ्या पिकाचा आधार घेऊन सरकारी मदतीवर लोकांनी दिवस काढले. परंतु त्यावेळी गरजा मर्यादित असल्याने वेळ निभावून गेली. आता महागाई प्रचंड वाढली आहे. शेतीखर्चही भरमसाठ झाला आहे. त्यामुळे शेतकरी भीषण संकटात सापडला आहे.

### थेट दाणा भरण्याच्या अवस्थेत पिके करपली

पावसाअभावी सोयाबीन, कापसासह मका, बाजरी, मूग, मठ आणि कपाशी यांसारखी पिके दाणा भरण्याच्या अवस्थेतच करपल्याचा दावा स्थानिक शेतकरी करीत आहेत. जोरदार पाऊस झाला तरी काही पिकांपासून अपेक्षित उत्पादन मिळणे कठीण असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

### चारा, पाण्याचेही आता भीषण संकट

पाण्याच्या उपलब्धतेनुसार काही भागांत हिरवळ दिसत आहे किंवा चांगल्या जमिनीत शेत शिवारात पिकेही दिसत आहेत. परंतु पावसाअभावी या पिकांना लागणच नाही आणि जिथे लागण झालेली आहे. त्याची वाढच झालेली नाही. त्यामुळे शेती उत्पन्न हाती लागण्याची शक्यता नाही. त्यातच चारादेखील काही दिवस पुरेल इतकाच आहे. तसेच प्रकल्पांतील पाणीही तळाला गेले आहे. त्यामुळे पुढील काळात चारा आणि पाण्याच्या पाण्याचे भीषण संकट उद्भवू शकते.

## थोडक्यात

### पाक-अफगाणमध्ये तणाव वाढला

**काबूल :** अफगाणिस्तानच्या कुनार प्रांतात पाकिस्तानी सैन्याने केलेल्या हवाई हल्ल्यात अमेरिकेच्या जीबीयू-१२ पेववे २ लेझर-गाईडेड बॉम्बचा वापर झाल्याचा संशय आहे. हा दावा अफगाण सूत्रांच्या आणि बॉम्बच्या अवशेषांच्या तपासणीच्या आधारे केला जात आहे. या हल्ल्यात नागरिकांच्या जीवितहानीचे वृत्त आहे. प्रकाशित छायाचित्रांमध्ये बॉम्बचे अवशेष दिसत आहेत, ज्यावर एमके ८२ फिन गाईडेड बॉम्बवर वापरासाठी आणि ९६२१४ हा कोड अशा खुणा आहेत. या खुणा पेववे गायडन्स सिस्टीमच्या कुटुंबाशी आणि रेथियॉन कंपनीशी संबंधित असल्याचे मानले जाते. जीबीयू-१२ पेववे २ हा सामान्यतः वापरल्या जाणाऱ्या एमके-८२ बॉम्बवर आधारित एक लेझर-मार्गदर्शित बॉम्ब आहे. त्याचे वजन अंदाजे २२७ किलोग्रॅम आहे. याची एकूण लांबी अंदाजे ३.३ मीटर आणि व्यास अंदाजे २७ सेंटीमीटर आहे. लेझर गायडन्स किटमुळे अचूक मारा करणे शक्य होते. लक्ष्यावर लेझरने खूण केली जाते आणि बॉम्ब त्या संकेतानुसार जातो. हा बॉम्ब अनेक देशांच्या हवाई दलाच्या शस्त्रागारात समाविष्ट आहे आणि विविध संघर्षांमध्ये त्याचा वापर केला गेला आहे.

# कॅन्सरच्या २७०० रुपयांच्या औषधाची रुग्णांना २७ हजारांना विक्री

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

सुप्रीम कोर्टानं कॅन्सरच्या उपचारामध्ये आवश्यक असलेल्या औषधांची विक्री करताना केल्या जाणाऱ्या नफेखोरीवर संताप व्यक्त केला.



रुग्णांवर भरदिवसा दरोडा टाकला जात असल्याचं सुप्रीम कोर्टानं म्हटलं. एका औषधाची एम.आर.पी. २७ हजार रुपये निश्चित करण्यात आली होती. मात्र, रिटेलर्सला ते औषध २७०० रुपयांना दिलं जातं.

ही समोर येताच सुप्रीम कोर्टानं संताप व्यक्त केला. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठानं ही बाब आम्हाला देखील हैराण करणारी असल्याचं म्हटलं. ज्या अधिकाऱ्यांनी याबाबत कारवाई केली पाहिजे ते देखील डोळे आणि कान बंद करुन बसल्यात असं म्हणत सुप्रीम कोर्टानं संताप व्यक्त केला.

**सुप्रीम कोर्टात काय घडलं ?**

औषधांचे दर नियंत्रित करण्यासाठी केंद्र सरकारला आदेश देण्यात यावेत यासाठी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल झाली आहे. त्याची सुनावणी सुरु असताना न्यायमूर्ती नाथ यांनी ही बाब हैराण करणारी असल्याचं म्हटलं. कॅन्सरचं एक आवश्यक औषध ज्याची एमआरपी २७ हजार रुपये होती ते औषध रिटेलरला २७०० रुपयांना मिळत होतं.रिटेलरला ज्या पैशात औषध मिळतं त्या किमतीच्या १० पट अधिक रक्कम रुग्णांकडून वसूल केली जाते. न्यायमूर्ती नाथ म्हणाले की ही सक्तीची वसुली नाही तर काय आहे. लोक उपचारांसाठी आपलं घर, दागिने विकतात, असं कोर्टानं म्हटलं. ही पूर्णपणे मनमानी असून बर्बादी असल्याचं म्हणत कोर्टानं संताप व्यक्त केला. रुग्णांवर भरदिवसा टाकलेला हा दरोडा असल्याचं कोर्टानं म्हटलं.

# पिंपरी चिंचवडमध्ये १४ डीजे चालकांवर गुन्हे, विसर्जन मिरवणुकीत ध्वनीप्रदुषणाचा ठपका

**वृत्तसंस्था, पुणे**

यंदाच्या गणेशोत्सवात पुण्यातील विद्यानंद बापटांचा इम्पॅक्ट पाहायला मिळत असून डीजे बंदीच्या मुद्द्यावरुन लोक आक्रमक झाल्यानंतर आता पोलिसांकडूनही कारवाई केली जात असल्याचं पाहायला मिळत आहे.



सोलापूर, नागपूर, पुण्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यात ध्वनीप्रदुषणाला टाळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा दाखला देत डीजे वाजवण्यावर बंदी घालण्यात आली आहे. तर, पुण्यातही जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी लेझर लाईट आणि डीजेचा वापर करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचा इशारा दिला होता. त्याच पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवडमध्य १४ डीजे चालक, मालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत १४ सप्टेंबर २०२६ पासून सुरु झालेल्या गणेशोत्सवादरम्यान डीजेचा कर्णकर्कश आवाज करणाऱ्या २० मंडळांवर आणि डीजे चालक मालकांवर कडक कारवाई करण्यात आली आहे. गणेशोत्सवापूर्वी पोलीस आयुक्त तसेच परिमंडळ उप आयुक्तांनी बैठका घेऊन डीजेमुळे लहान मुले, वयोवृद्ध आणि आजारी व्यक्तींना त्रास होत असल्याने ध्वनीप्रदूषण न करण्याच्या स्पष्ट सूचना आणि समज दिली होती.

तरीसुद्धा २१ सप्टेंबर २०२६ रोजी, म्हणजेच गणेशोत्सवाच्या सातव्या दिवशी गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान निर्धारित ध्वनी मर्यादेचे उल्लंघन करून ध्वनीप्रदूषण केल्याप्रकरणी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत एकूण २० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यासह पोलिसांकडून मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. त्यामध्ये सांगवी पोलीस स्टेशनमध्ये सर्वाधिक ९, तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशनमध्ये ५, भोसरी एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये १, शिरगाव पोलीस स्टेशनमध्ये २, तळेगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये १ आणि बावधन पोलीस स्टेशनमध्ये १ गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# समुद्रातील तापमान ३.०५ अंशाने वाढले

**वृत्तसंस्था, कोस्टा रिका**

एल निनोने पॅसिफिक महासागरात एक नवीन ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे. या प्रदेशात समुद्राच्या पृष्ठभागाचे सरासरी तापमान सामान्यपेक्षा ३.०५ अंश सेल्सिअसने वाढले आहे. १९९१-२०२० च्या सरासरीच्या तुलनेत, हे आतापर्यंत नोंदवलेले सर्वाधिक दैनिक तापमान आहे. एल निनोने इतिहासातील सर्वोच्च तापमान ३.०४७ अंश सेल्सिअसवर पोहोचवले आहे आणि आपत्ती अटळ आहे असा इशारा संशोधकांनी दिला आहे.

एल निनोने समुद्राच्या पृष्ठभागाच्या तापमानाचा इतिहासातील सर्वोच्च विक्रम नोंदवला आहे. पारा ३.०५ अंश सेल्सिअसने वाढला आहे. तो आणखी वाढू शकतो. यामुळे आता जगाची चिंता वाढली आहे. यापूर्वीचा विक्रम नोव्हेंबर २०१५ मध्ये अंदाजे ३.०२ अंश सेल्सिअस होता. यावेळी, ही पातळी सामान्यपेक्षा दोन महिने आधी, सप्टेंबरमध्ये गाठली गेली. शास्त्रज्ञांच्या मते, ही एल निनो घटना अजूनही तीव्र होत आहे आणि डिसेंबरपर्यंत ती आपल्या शिखरावर पोहोचू शकते. एल निनो ही एक नैसर्गिक हवामान घटना आहे, ज्यामध्ये पूर्व आणि मध्य पॅसिफिक महासागराचे पाणी सामान्यपेक्षा जास्त वाढते. वाऱ्यांमधील बदलांमुळे हे घडते. गरम पाण्यामुळे बाष्पीभवन वाढते, ज्यामुळे जागतिक हवामानावर परिणाम होतो. ही घटना नऊ महिन्यांपूर्वी पश्चिम पॅसिफिकमधील वाऱ्यांमधील बदलांमुळे सुरू झाली आणि हळूहळू सुपर एल निनोच्या पातळीवर पोहोचली आहे. निनो ३.४ प्रदेश हा पॅसिफिक महासागराचा एक भाग आहे, जिथे एल निनोची तीव्रता तपासण्यासाठी तापमान मोजले जाते. ३.०५ अंश सेल्सिअस हे आधुनिक नोंदींमधील सर्वोच्च तापमान आहे. याने १९८२, १९९७ आणि २०१५ सारख्या तीव्र घटनांना मागे टाकले आहे. काही अंदाज तर याची तुलना १८७७ च्या ऐतिहासिक घटनेशी करत आहेत, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर दुष्काळ आणि उपासमार झाली होती. मॉडेल्सनुसार, मासिक सरासरी तापमान याहूनही जास्त असू शकते.

# भारतीय महिला क्रिकेट संघाने रचला इतिहास!

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम सामन्यात श्रीलंका संघाचा धुव्वा उडवत भारतीय महिला क्रिकेट संघाने सुवर्णपदकावर मोहोर उमटवली आहे. टीम इंडियाने दिलेल्या २१७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेचा संघ १५.४ षटकांत ६९ धावांत सर्वबाद झाला. भारतीय महिला संघाने १४७ धावांच्या फरकाने विजय मिळवला. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील नेतृत्वाखालील संघाने केलेल्या दमदार कामगिरीमुळे भारताने या स्पर्धेत सुवर्ण पदकाचे खाते उघडले आहे.



आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघाने श्रीलंकेसमोर विजयासाठी २१७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर, भारतीय संघाने २० षटकांत ३ गडी गमावून २१६ धावा केल्या. सलामीवीर स्मृती मानधनाने अर्धशतक झळकावले, तर रिचा घोष आणि शफाली वर्मा यांनी प्रभावी फलंदाजी केली. मानधना आणि शफाली यांनी पहिल्या विकेटसाठी ९९ धावांची भागीदारी करत भारताला भक्कम सुरुवात करून दिली.

मानधनाने ३० चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. मात्र, शफालीचे अर्धशतक हुकले आणि ती ४८ धावांवर बाद झाली. त्यानंतर कर्णधार हरमनप्रीत कौर १९ धावांवर बाद झाल्याने भारताला दुसरा धक्का बसला. मानधनाने आपली खेळी सुरू ठेवली, पण अखेरीस ती ४५ चेंडूंत ७९ धावा करून बाद झाली; तिने या खेळीत पाच चौकार आणि सात षटकार लगावले. त्यानंतर रिचा घोषने आक्रमक फलंदाजी करत भारताची धावसंख्या २०० च्या पार नेली. रिचा आणि भारती फुलमाली यांनी चौथ्या विकेटसाठी ५३ धावांची भागीदारी केली. रिचा २२ चेंडूंत ४९ धावांवर (सहा चौकार आणि तीन षटकारांसह) नाबाद राहिली, तर भारती ७ धावांवर नाबाद राहिली. श्रीलंकेकडून सुगंधिका कुमारी, कविशा दिलहारी आणि चामुडी प्रबोधा यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

भारताने दिलेल्या विशाल आव्हानाचा पाठलाग करताना श्रीलंकेची सुरुवात अडखळत झाली. १८ धावांवर शफाली वमार्ने इमिशा दुलानीला बाद करून पॅव्हेलियनमध्ये धाडले. यानंतर शफाली वर्माने हसिनी परेरा बाद केले आहे; हसिनीला खातेही उघडता आले नाही .

दोन झटपट गडी गमावल्यानंतर श्रीलंकेची कर्णधार चमारी अथापथ्थूने डाव सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र दीप्ती शमार्ने तिला २९ धावांवर बाद करत श्रीलंका संघाला मोठा धक्-का दिला. तिने २१ चेंडूचा सामना करत पाच चौकारांसह २९ धावा केल्या.

श्रेयंका पाटीलने हर्षिता समरविक्रमाला बाद करून श्रीलंकेला चौथा धक्का दि. ४४ धावांच्या धावसंख्येवर श्रीलंकेने चार विकेट्स गमावल्या. या दीप्ती शर्माने भारतीय महिला संघासाठी सहावी विकेट घेतली आहे.



संपादकीय लेखणीतून...

## माघारी फिरलेला 'मा'न्सुन

देशातून पावसाचा हंगाम संपुष्टात येण्याची चाहूल लागली असतानाच वातावरणात अचानक मोठा बदल दिसून येत आहे. नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी पश्चिम राजस्थानच्या काही भागातून माघार घेण्यास सुरुवात केली आहे. पंजाब, हरियाणा, सौराष्ट्र-कच्छ भागातून मान्सून वेगाने परतण्यासाठी पूरक स्थिती निर्माण झाली आहे. साधारणपणे परतीचा हा प्रवास १७ सप्टेंबरपासून सुरू होत असतो मात्र यंदा २ दिवस उशिराने म्हणजे १९ सप्टेंबर रोजी मान्सूनने पहिली माघार घेतली. उत्तर भारतातून पाऊस काढता पाय घेत असतानाच महाराष्ट्रावर पुन्हा एकदा पावसाचे ढग दाटून आले आहेत. बंगालच्या उपसागरात निर्माण होणाऱ्या नव्या हवामान प्रणालीमुळे राज्यात पावसासाठी अनुकूल वातावरण तयार झाले असून विदर्भ, मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रात दमदार सरी कोसळण्याचा अंदाज आहे. उत्तर अंदमान समुद्र आणि त्याच्या लगतच्या भागावर वा-यांची एक तीव्र चक्राकार स्थिती निर्माण झाली आहे.

या प्रणालीचे रुपांतर लवकरच एका कमी दाबाच्या क्षेत्रामध्ये होणार आहे. हा कमी दाबाचा पट्टा पश्चिम-वायव्य दिशेने पुढे सरकत पुढील ३ ते ४ दिवसांत दक्षिण ओडिशा आणि उत्तर आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर पोहोचण्याची शक्यता आहे. या पट्ट्याच्या प्रभावामुळे महाराष्ट्राच्या दिशेने मोठ्या प्रमाणावर बाष्प खेचले जाणार असून २० ते २५ सप्टेंबर या कालावधीत महाराष्ट्र आणि गोवा किनारपट्टीवर पावसाची तीव्रता लक्षणीयरित्या वाढेल. हवामान विभागाने दिलेल्या इशा-यानुसार २३ सप्टेंबरपर्यंत राज्यातील विविध भागांमध्ये मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि ताशी ३० ते ४० कि. मी. वेगाने वाहणा-या वा-यासह जोरदार पावसाची शक्यता आहे. सातारा, कोल्हापूर आणि पुणे जिल्ह्यांमधील बहुतांश भागात मध्यम ते जोरदार सरींची नोंद होईल. २१ सप्टेंबर रोजी नाशिक आणि लगतच्या पट्ट्यात पावसाचा चांगला प्रभाव दिसून येईल तर अहिल्यानगर जिल्ह्यातही रिमझिम ते मध्यम पाऊस पडेल. बंगालच्या उपसागरातील प्रणालीचा थेट फायदा या भागाला मिळणार असून २२ सप्टेंबर रोजी मराठवाड्याच्या बहुतांश जिल्ह्यात जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

२१ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या संपूर्ण आठवड्यात राज्याच्या अंतर्गत भागात पावसाची चांगली उपस्थिती पहावयास मिळेल. पावसाळ्याच्या या अखेरच्या टप्प्यातील पुनरागमनामुळे कोरड्या पडत चाललेल्या शेती पिकांना संजीवनी मिळणार असून बळीराजाला मोठा दिलासा मिळणार आहे. राज्यात गत काही दिवसापासून पावसाने पाठ फिरवली होती. राज्यात सध्या उन्हाचा चटका वाढत असतानाच वादळी पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे. पुढील ७२ तासात मुसळधार पाऊस कोसळणार असून भारतीय हवामान विभागाने २२ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. मुंबई, ठाणे, पालघरमध्ये मध्यम पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यातील परभणी, हिंगोली, धाराशिव, लातूर आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये पावसाचा मोठा इशारा देण्यात आला आहे त्यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आले आहे. एल निनोच्या प्रभावामुळे राज्यातील अनेक भागात पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. आता पावसाने पुन्हा जोर पकडण्याची शक्यता आहे.

कोकण, मराठवाडा आणि विदर्भात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. महाराष्ट्रात गत काही दिवसापासून पावसाने विश्रांती घेतली असून अनेक भागात पावसाअभावी परिस्थिती चिंताजनक बनली आहे. राज्यातील काही जिल्ह्यात पिके करपली गेल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे आहे. धरणातील पाणीसाठा कमी झाल्याने आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होणार आहे. राज्यातील काही ठिकाणी कमी वेळेत झालेल्या जोरदार पावसामुळे शेतीचे नुकसान झाले आहे. ऑगस्ट महिन्यात अपेक्षेप्रमाणे पाऊस झाला नाही त्याचा परिणाम खरीप पिकांवर झाला. काही भागात अतिवृष्टी तर काही भागात पावसाची दांडी अशी परिस्थिती होती. शेतीसोबतच पशुधनाच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील काही दिवस पाऊस झाल्यास पाणीसाठ्यात वाढ होण्यास आणि शेतीला दिलासा मिळण्यास मदत होऊ शकते.



# रशियन राजकारणात पुतीन युगाचा 'युनायटेड रशिया' पक्षाचा संसदेत ऐतिहासिक आणि विक्रमी विजय

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

रशियाच्या राजकीय पटलावर राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या सत्ताधारी 'युनायटेड रशिया' पक्षाने मिळवलेला ताजा विजय हा त्यांच्या निर्विवाद वर्चस्वाचा, अफाट लोकप्रियतेचा आणि राजकीय चातुर्याचा सर्वात मोठा व स्पष्ट पुरावा ठरला आहे. रशियाच्या संसदेत म्हणजेच 'स्टेट डुमा'मध्ये या पक्षाने आजवरचे सर्व विक्रम मोडीत काढत एक नवा आणि अभूतपूर्व इतिहास रचला आहे. संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिलेल्या या निवडणुकीत, २१ सप्टेंबर २०२६ रोजी जाहीर झालेल्या प्राथमिक निकालांनुसार, 'युनायटेड रशिया'ने संसदेच्या एकूण ४५० जागांपैकी तब्बल ३५५ जागांवर दणदणीत विजय संपादन केला आहे. हा विजय केवळ संख्यात्मकदृष्ट्या मोठा नसून, रशियाच्या आगामी राजकीय वाटचालीची आणि जागतिक राजकारणातील त्यांच्या भूमिकेची निश्चित दिशा ठरवणारा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. देशांतर्गत विरोधकांना नामोहरम करत मिळवलेला हा विजय पुतीन यांच्या राजकीय कारकिर्दीतील एक सुवर्णपान ठरला आहे.

या प्रचंड विजयाचे सर्वात मोठे आणि लक्षवेधी वैशिष्ट्य म्हणजे 'युनायटेड रशिया' पक्षाने स्वतःचाच मागील विक्रम मोठ्या फरकाने मोडीत काढला आहे. यापूर्वी २०१६ मध्ये झालेल्या संसदीय निवडणुकीत या पक्षाने ३४३ जागा जिंकल्या होत्या, मात्र यंदा ३५५ जागा जिंकून त्यांनी राजकीय यशाचे एक नवे आणि गाठायला कठीण असे शिखर सर केले आहे. या ऐतिहासिक विजयामुळे संसदेत पक्षाला 'सुपरमेज्यॉरिटी' म्हणजेच घटनात्मक महाबहुमत प्राप्त झाले आहे. या महाबहुमताचे रशियन राजकारणात आणि राज्यव्यवस्थेत अत्यंत दूरगामी परिणाम आहेत.

आता रशियाच्या संसदेत कोणताही नवा कायदा तातडीने मंजूर करणे, राज्यघटनेत हवे तसे मोठे बदल करणे किंवा राष्ट्राच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेणे पुतीन यांच्या सरकारसाठी विनाअडथळा आणि सहज शक्य होणार आहे. देशांतर्गत आर्थिक निर्णय असोत वा आंतरराष्ट्रीय पातळीवरील धोरणे, विरोधी पक्षांचा कोणताही मोठा अडथळा संसदेत उरलेला नाही. यामुळे पुतीन यांना राजकीय, प्रशासकीय आणि लष्करी पातळीवर निर्णय घेण्यासाठी संपूर्ण मोकळीक मिळाली आहे, जी आजच्या युद्धजन्य परिस्थितीत त्यांच्यासाठी अत्यंत आवश्यक होती.

या निवडणुकीत इतर राजकीय पक्षांची स्थिती अत्यंत कमकुवत आणि निष्प्रभ असल्याचे पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहे. एकेकाळी रशियाच्या राजकारणात दबदबा असलेल्या कम्युनिस्ट पार्टीला यंदा केवळ ४० जागांवर समाधान मानावे लागले असून, ते कसेबसे दुसऱ्या स्थानावर राहिले आहेत. तसेच, राष्ट्रवादी विचारसरणीच्या 'एलडीपीआर' पक्षाला २५ आणि नव्याने उदयास आलेल्या 'न्यू पीपल' पक्षाला केवळ २० जागांपर्यंतच मजल मारता आली आहे. रशियासारख्या विस्तीर्ण देशात सलग तीन दिवस चाललेल्या या प्रदीर्घ मतदान प्रक्रियेनंतर, रशियाच्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या प्रमुख एला पामफिलोव्हा यांनी हे अधिकृत प्राथमिक निकाल जाहीर केले. या निवडणुकीत देशातील एकूण ५९ टक्क्यांहून अधिक मतदारांनी आपला हक्क बजावल्याची नोंद करण्यात आली आहे. हा आकडा रशियन जनतेचा निवडणूक प्रक्रियेतील वाढता सहभाग आणि सत्ताधारी पक्षावर असलेला विश्वास अधोरेखित करतो.

या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेला एक अत्यंत महत्त्वाची, गंभीर आणि संवेदनशील किनार आहे, ती म्हणजे रशिया-युक्रेन युद्धाची पार्श्वभूमी. २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर सुरू केलेल्या विशेष लष्करी कारवाईनंतर देशात पार पडलेली ही पहिलीच सार्वत्रिक संसदीय निवडणूक होती. त्यामुळे या निवडणुकीकडे केवळ एक राजकीय प्रक्रिया म्हणून न पाहता, युद्धाबाबत जनतेचा कौल काय आहे, हे पाहण्याची संधी म्हणून जगभरातील राजकीय विश्लेषक याकडे पाहत होते. विशेष म्हणजे, मतदानाच्या काळात राजधानी मॉस्को आणि आजूबाजूच्या सीमावर्ती भागांत युक्रेनकडून मोठ्या प्रमाणावर ड्रोन हल्ले करण्यात आले, तसेच देशाच्या निवडणूक यंत्रणेवर आणि सरकारी वेबसाइट्सवर सायबर हल्लेही झाले. अशा तणावपूर्ण, अस्थिर आणि युद्धजन्य परिस्थितीतही सत्ताधारी पक्षाने मिळवलेला हा दणदणीत विजय पुतीन यांच्या आक्रमक परराष्ट्र आणि संरक्षण धोरणांना देशांतर्गत पातळीवर मिळालेला मोठा आणि भक्कम राजकीय पाठिंबा दर्शवतो. देशावर संकट असताना रशियन जनता नेहमीच आपल्या खंबीर नेतृत्वाच्या पाठीशी उभी राहते, हा इतिहास या निवडणुकीने पुन्हा एकदा खरा करून दाखवला आहे.

गेल्या दोन दशकांहून अधिक काळ रशियाच्या सत्तेच्या केंद्रस्थानी अढळपणे उभे असलेल्या व्लादिमीर पुतीन यांनी या निवडणुकीच्या माध्यमातून देशावरील आणि व्यवस्थेवरील आपली राजकीय पकड अधिकच घट्ट आणि अभेद्य केली आहे. सत्ताधारी 'युनायटेड रशिया' पक्षाला मिळालेला हा अभूतपूर्व आणि ऐतिहासिक जनाधार केवळ देशांतर्गत राजकारणापुरता किंवा प्रशासकीय सोयीपुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण जगासाठी, विशेषतः अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रांसाठी एक अत्यंत स्पष्ट, कठोर आणि थेट संदेश आहे.

पाश्चिमात्य देशांनी लादलेले कडक आर्थिक निर्बंध, युक्रेन युद्धामुळे जागतिक स्तरावर झालेली राजकीय कोंडी, आंतरराष्ट्रीय न्यायालयांचे दबाव आणि देशांतर्गत निर्माण झालेला तणाव या सर्व महाभयंकर आव्हानांना अत्यंत शिताफीने परतवून लावत पुतीन यांनी आपला राजकीय बालेकिल्ला केवळ सुरक्षितच ठेवला नाही, तर तो अधिक अभेद्य बनवला आहे. हा महाविजय हेच दर्शवतो की, रशियन जनतेने सद्यस्थितीत कोणत्याही प्रकारच्या नेतृत्वातील बदलापेक्षा किंवा प्रयोगापेक्षा राजकीय स्थिरतेला, राष्ट्रीय सुरक्षेला आणि पुतीन यांच्या आक्रमक राष्ट्रवादी धोरणांना स्पष्ट पसंती दिली आहे.

या ३५५ जागांच्या महाबहुमतामुळे आता पुतीन यांना देशाची संपूर्ण अर्थव्यवस्था युद्धाच्या आणि लष्कराच्या गरजेनुसार वळवण्यासाठी, देशांतर्गत विरोधकांना नियंत्रणात ठेवण्यासाठी, नवीन लष्करी भरतीचे कायदे अधिक कठोर करण्यासाठी आणि परराष्ट्र धोरणात कोणत्याही दबावाला बळी न पडता अधिक आक्रमक पावले उचलण्यासाठी संसदेची पूर्ण आणि कायदेशीर मान्यता मिळाली आहे.

आगामी काळात जागतिक राजकारणात, विशेषतः नाटो देशांसोबतच्या संघर्षात आणि ब्रिक्ससारख्या संघटनांच्या माध्यमातून बहुध्रुवीय जग निर्माण करण्याच्या प्रयत्नांत, रशियाची भूमिका अधिक आक्रमक, प्रभावी आणि तडजोड न करणारी राहण्याची दाट शक्यता आहे. जागतिक महासत्तांचा वाढता दबाव, युद्धाचे आर्थिक व सामाजिक पडसाद आणि भविष्यातील अनिश्चितता या सर्व पार्श्वभूमीवर, रशियन जनतेने पुन्हा एकदा पुतीन यांच्याच नेतृत्वावर अढळ आणि अंध विश्वास दाखवला असून, रशियाची संपूर्ण राजकीय, आर्थिक, लष्करी आणि सामाजिक दिशा आता पुतीन यांच्याच नेतृत्वाखाली अत्यंत ठामपणे, वेगवान गतीने आणि त्यांच्याच अटींवर पुढे पडेल, या वास्तवावर या ऐतिहासिक निकालाने अंतिम आणि न पुसता येणारा शिक्कामोर्तब केले आहे.

– ९५६१५९४३०६

# भारतीय महिलांना मिळाले सुवर्ण तर पुरुष जपान विरुद्ध अडखळत जिंकले

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ चा अंतिम सामना निशिन येथील कोरोगी स्पोर्ट्स पार्क येथे भारतीय महिला संघ आणि श्रीलंका यांच्यात खेळला गेला. भारतीय संघाने हा सामना १४७ धावांनी जिंकून आशियाई क्रीडा स्पर्धेतील आपले पहिले सुवर्णपदक पटकावले. श्रीलंकेने रौप्यपदक जिंकले. यापूर्वी, पाकिस्तानने बांगलादेशला हरवून कांस्यपदक मिळवले होते. अंतिम सामन्यात भारताने श्रीलंकेवर धावांच्या फरकाने एकतर्फी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय महिला संघाने २० षटकांत ३ गडी गमावून २१६ धावा केल्या. प्रत्युत्तरात, श्रीलंकेचा महिला संघ १५.४ षटकांत ६९ धावांवर सर्वबाद झाला. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये धावांच्या बाबतीत भारतीय महिला संघाचा हा सर्वात मोठा विजय आहे.

**मंधाना आणि रिचा घोष यांची उत्कृष्ट खेळी**

आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतीय महिला संघाने श्रीलंकेसमोर २१७ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले. भारताने दमदार सुरुवात केली, सलामीवीर स्मृती मंधाना आणि शेफाली वर्मा यांनी पहिल्या विकेटसाठी ९९ धावांची शानदार भागीदारी केली. स्फोटक फलंदाजी करणाऱ्या मंधानाने अवघ्या ३० चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. तिने ४५ चेंडूंमध्ये ७९ धावांची खेळी करताना ५ चौकार आणि ७ षटकार मारले. शेफाली वर्मा ४८ धावांवर बाद झाल्याने तिचे अर्धशतक हुकले, तर कर्णधार हरमनप्रीत कौर केवळ १९ धावाच करू शकली. त्यानंतर रिचा घोषने वेगाने धावा करत संघाला २०० धावांच्या पुढे नेले. तिने २२ चेंडूंमध्ये नाबाद ४९ धावा केल्या आणि भारतीसोबत ५३ धावांची भागीदारी केली. अशाप्रकारे, भारतीय संघाने आपल्या निर्धारित २० षटकांत ३ गडी गमावून २१६ धावा केल्या आणि महिला आशियाई खेळांच्या इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या नोंदवली.

**दबावाखाली श्रीलंकेचे फलंदाज कोसळले**

श्रीलंकेसाठी लक्ष्याचा पाठलाग करण्याची सुरुवात चांगली नव्हती. त्यांचे फलंदाज सुरुवातीपासूनच दबावाखाली दिसत होते. सलामीवीर इमेशा दुलानी १० चेंडूंत ३ धावा करून बाद झाली, तर हसिनी परेरा शून्यावर तंबूत परतली. श्रीलंकेकडून कर्णधार चमारी अथापट्टूने २१ चेंडूंत २९ धावा करून सर्वाधिक धावा केल्या. तिच्यापाठोपाठ कविशा दिलहारीने ११ धावा केल्या. उर्वरित फलंदाज विशेष प्रभाव पाडण्यात अपयशी ठरले. भारताकडून दीप्ती शर्माने सर्वाधिक तीन बळी घेतले. श्री चरणी आणि श्रेयंका पाटील यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.

**आशियाई क्रीडा स्पर्धेतील महिलांची सर्वोच्च धावसंख्या**

महिला आशिया चषकातील ही सर्वोच्च धावसंख्या आहे. यापूर्वी कोणत्याही संघाने २१६ धावांचा टप्पा गाठलेला नाही. आशियाई क्रीडा स्पर्धेत एखाद्या संघाने २०० धावांचा टप्पा ओलांडण्याची ही केवळ दुसरी वेळ आहे. गेल्या हंगामात हाँगकाँगने मंगोलियाविरुद्ध ही कामगिरी केली होती.

**पाकिस्तान तिसऱ्या क्रमांकावर**

२० व्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील महिला क्रिकेट स्पर्धेच्या कांस्यपदकाच्या सामन्यात पाकिस्तानने बांगलादेशचा पराभव केला. पाकिस्तानने बांगलादेशला ३१ धावांनी हरवून कांस्यपदक पटकावले. पाकिस्तानी महिला क्रिकेट संघाने १२ वर्षांनंतर आशियाई क्रीडा स्पर्धेत पदक जिंकले. पाकिस्तानच्या विजयात कर्णधार फातिमा सनाने महत्त्वाची भूमिका बजावली.

**पाकिस्तानने बांगलादेशला हरवले**

या सामन्यात पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करत बांगलादेशसमोर २० षटकांत १४६ धावांचे लक्ष्य ठेवले. मात्र, बांगलादेशचा महिला संघ २० षटकांत ७ गडी गमावून केवळ ११४ धावाच करू शकला. बांगलादेशकडून शर्मिन अख्तरने सर्वाधिक ४६ धावा केल्या, तर कर्णधार निगार सुलतानाने २५ धावा केल्या. मात्र, या दोघींव्यतिरिक्त बहुतेक फलंदाज दुहेरी आकडा गाठण्यात अपयशी ठरल्या. सलामीवीर दिलारा अख्तरने १२ धावा केल्या, पण त्या पुरेशा नव्हत्या.

**पाकिस्तानची गोलंदाजी कशी होती ?**

कांस्यपदकाच्या सामन्यात, पाकिस्तानसाठी उम्म-ए-हानी सर्वात यशस्वी गोलंदाज ठरली, तिने ४ षटकांत १० धावा देऊन ३ बळी घेतले. नशरा संधू, तुबा हसन, तस्मिया रुबाब आणि कर्णधार फातिमा सना यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. फातिमा सनाने कर्णधारपदाची खेळी केली.

यापूर्वी, प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने २० षटकांत ८ गडी गमावून केवळ १४५ धावा केल्या. यापैकी ४५ धावा एकटीने पाकिस्तानची कर्णधार फातिमा सनाने केल्या. ती पाकिस्तानी संघासाठी सर्वात यशस्वी फलंदाज ठरली. तिने ३० चेंडूंमध्ये तीन षटकार आणि तितक्याच चौकारांच्या मदतीने ह्या धावा केल्या. फातिमा सना व्यतिरिक्त, गुल फिरोझाने ३१ धावा, तर आलिया रियाझने २५ धावा केल्या. केवळ ह्या फलंदाजांच्या जोरावरच पाकिस्तान १४० पेक्षा जास्त धावसंख्या गाठू शकला.

**१२ वर्षांनंतर पदक जिंकले**

पाकिस्तानच्या महिला संघाने बांगलादेशला हरवून १२ वर्षांनंतर आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटमध्ये पदक जिंकले. पाकिस्तानच्या महिला संघाने जिंकलेले शेवटचे पदक २०१४ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक होते. त्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला संघाने भाग घेतला नव्हता. २०१८ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेट खेळले गेले नाही. २०२३ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत कांस्यपदकाच्या सामन्यात बांगलादेशने पाकिस्तानला हरवले होते. यावेळी पाकिस्तानच्या महिला संघाने बांगलादेशसोबत हिशोब चुकता केला.

**पुरुष संघाचा अडखळत विजय**

भारत आणि जपान यांच्यातील एकमेव ऐतिहासिक टी२० आंतरराष्ट्रीय सामना २२ सप्टेंबर, २०२६ रोजी खेळला गेला आणि भारताने २ धावांनी विजय मिळवला. दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधांच्या ७५ वर्षांच्या (सुझुकी कप) स्मरणार्थ हा सामना जपानमधील सानो आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर आयोजित करण्यात आला होता. पावसामुळे सामना प्रत्येक संघासाठी ५ षटकांचा करण्यात आला.

नाणेफेक जिंकून फलंदाजी करताना भारताच्या ५ षटकात ४ बाद ३२ धावा झाल्या होत्या. खेळपट्टी गेली दोन दिवस पावसामुळे झाकून ठेवली असल्याने तिच्यात दमरपणा होता त्याचा फायदा दोन्ही संघांच्या फिरकी गोलंदाजांनी उचलला भारताकडून अभिषेक व ईशान शुन्यावरच परतले तर संजूने आठ धावा केल्या. कर्णधार श्रेय्यस अय्यरने १६ धावा काढल्या. मात्र संघाला मोठी धावसंख्या उभी करता आली नाही. भारतीय गोलंदाज अक्षर, सुंदर व बिश्नोईने छोट्या धावांचा यशस्वी बचाव केला मात्र त्यांचा चांगलाच घामटा निघाला.

दोन धावांनी का होईना विजय मिळवून विश्व विजेत्यांनी आपली इज्जत राखली अन्यथा आयर्लंड सारख्या संघाविरुद्ध झाले तसे वस्त्रहरण होण्याची वेळ या सामन्यातही आली होती.

– ९०९६३७२०८२

# सिंचना संतोष:आर्थिक साक्षरतेची वाटसरू

शशिकांत तोटे
दारव्हा, जि.यवतमाळ

सध्या सोशल मीडियावर बंगळुरू ची किशोरवयीन सिंचना संतोष चे कार्य मोठ्या प्रमाणात चर्चित आहे.आजच्या काळात आर्थिक साक्षरता ही केवळ मोठ्यांसाठी आवश्यक असलेली बाब राहिली नाही. सिंचना संतोष या किशोरीने ज्याप्रमाणे आर्थिक साक्षरता जपली आहे, तिची चर्चा होणे साहजिकच आहे. प्रामुख्याने युरोपियन देशात, लहान वयातच पैशाचे नियोजन, बचत, गुंतवणूक, जोखीम, कमाई व खचार्ची आर्थिक शिस्त विशेषतः बघायला मिळते. युरोपातील किशोरवयीन वगार्चा आर्दश आर्थिक साक्षरतेच्या वाटेवर सिंचना संतोष देशात जपत आहे.

मूळ बंगळुरूची असलेली सिंचना संतोष या किशोरीने पर्सनल फायनान्स,शेअर बाजार आणि म्युच्युअल फंड सारख्या विषयांचा तिने स्वतःअभ्यास केला.तिच्या गुंतवणुकीमध्ये इक्विटी आणि म्युच्युअल फंडाचा समावेश आहे.ती अल्पवयीन असल्यामुळे गुंतवणूक प्रक्रिया पालकांच्या देखरेखीखाली केली जाते.

तिचीही जिद्द वाखण्याजोगी आहे.आजच्या डिजिटल युगात शेअर बाजार आणि आर्थिक गुंतवणुकीची चर्चा मोठ्या प्रमाणात होत असते. परंतु आर्थिक फसवणूक टाळून कष्टाच्या पैशाचे नियोजन करणे भल्याभल्यांना जमतेच असे नाही. विशेषतः लहान वयात आर्थिक क्षेत्राची वाट निवडणे हे मोठे आव्हान असते. मात्र हे आव्हान सिंचना संतोष ने स्वीकारलेले दिसते.लहान वयातच हातात असलेल्या पैशाची किंमत समजावून घेणे व पैशाचे योग्य नियोजन कसे करता येईल,ह्याचा शोध तिने घेतला. सिंचनाच्या आर्थिक प्रवासाचा प्रारंभ मोठ्या भांडवलाने झाला नाही.तिने कुठलीही मोठी गुंतवणूक व महागडा अभ्यासक्रम पूर्ण केला नाही. तिची गुल्लक आणि धोरणात्मक बचेतीतून आर्थिक जाणीवेत सुरुवात झाली. शेअर बाजार, म्युच्युअल फंड, व्याज, महागाई, आर्थिक जोखीम हे विषय सहसा समजण्यास अवघड असतात. किंबहुना सिंचनाने इंटरनेटवरील उपलब्ध माहिती, युट्युब वरील आर्थिक व्हिडिओ आणि स्व-अध्ययनाच्या व्यासंगातून आपले आर्थिक ज्ञान वाढविले. एकंदरीत सोशल मीडियाचा वापर मोठ्या जबाबदारीने व ज्ञान संपादित करून आर्थिक साक्षरतेच्या बळकटीसाठी केला.

केवळ शेअर बाजारात पैसे गुंतवणे हा तिचा उद्देश न राहता, गुंतवणुक का करावी? दीर्घकालीन आर्थिक नियोजनाचे महत्त्व आणि त्यात असलेली जोखीम हे समजून घेण्यावर तिने भर दिलेला दिसतो. आपल्याला जे काही शिकायला मिळाले,ते इतरही मुलांपर्यंत पोहोचावे.या विचारातून ती मुलांसाठी 'फायनान्शिअल लिट्रेसी गेम कार्ड' तयार करण्याचा प्रयत्नात आहे. ज्याव्दारे बजेट, बँकिंग,व्याज, महागाई,विमा कर्ज,जोखीम आणि फसवणूक सारख्या विषयाची ओळख मुलांना खेळातून करून देण्याचा प्रयत्न आहे. शेअर बाजाराकडे केवळ झटपट पैसा कमविण्याचे साधन म्हणून न पाहता;ज्ञान,संयम आणि जोखीम समजून घेण्याचे क्षेत्र म्हणून पाहण्याचा संदेश सिंचना संतोषच्या प्रवासातून मिळतो. ऐवढे मात्र नक्कीच.

– ९१३०८३५४५८

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# नागपूर पदवीधर मतदारसंघासाठी २३ ऑक्टोबरला मतदान

## २९ सप्टेंबरला अधिसूचना, ६ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार, २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी,नागपूर विभागात आदर्श आचारसंहिता लागू

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
महाराष्ट्र विधान परिषदेच्या नागपूर पदवीधर मतदारसंघासह राज्यातील पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. त्यानुसार नागपूर पदवीधर मतदारसंघासाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार असून, मतदानाची वेळ सकाळी ८ ते सायंकाळी ४ अशी राहणार आहे.
निवडणूक कार्यक्रमानुसार २९ सप्टेंबर २०२६ रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर असून, ७ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ ऑक्टोबर आहे. २३ ऑक्टोबर रोजी मतदान झाल्यानंतर २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी करण्यात येणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ पूर्वी पूर्ण करण्यात येणार आहे. नागपूर पदवीधर मतदारसंघांतर्गत संबंधित सहाही जिल्ह्यांमध्ये तत्काळ प्रभावाने आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक प्रक्रिया भारत



निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार पार पाडण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांसाठी ही निवडणूक होत आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार २९ सप्टेंबर रोजी अधिसूचना, ६ ऑक्टोबर उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख, ७ ऑक्टोबर अर्जांची छाननी, ९ ऑक्टोबर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख, २३ ऑक्टोबर मतदान आणि २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे.

थोडक्यात

### विठ्ठलनगरातील गणेशोत्सवात योगायोगाची अनोखी जुळवाजुळव, अष्टमीच्या दिवशी घडला भक्तीमय क्षण



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
दक्षिण नागपुरातील विठ्ठलनगर नं. १ येथील, दिलीप चुटे यांच्या निवासस्थानी विराजमान असलेल्या श्री गणेशाला यंदा ४२ वर्षे पूर्ण झाली आहेत. अष्टमीच्या दिवशी गणरायाच्या दर्शनासाठी आलेल्या चार मान्यवरांच्या नावात 'दिलीप' ही एकच समानता असल्याने हा अनोखा योगायोग उपस्थितांच्या चर्चेचा विषय ठरला. यावेळी श्री गणेश टेकडी मंदिराचे सचिव दिलीपराव शहाकार, गणेश मंदिरातील दिलीप चुटे, एनएमसी विभागातील दिलीपराव वंजारी आणि पत्रकार भवनाचे देवरावजी प्रधान हे चौघेही एकत्र आले. विशेष म्हणजे या चौघांचीही एकच रास असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे अष्टमीच्या शुभदिनी गणरायाच्या साक्षीने जुळून आलेला हा योगायोग म्हणजे श्री गणेशाची कृपाच असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. ४२ वर्षांपासून सुरू असलेल्या या गणेशोत्सवाच्या परंपरेत यंदा घडलेला हा अनोखा संगम भक्तांसाठी विशेष आनंदाचा ठरला. गणरायाच्या चरणी सर्वांनी प्रार्थना करून सुख, समृद्धी आणि आरोग्याची कामना केली.

### बल्लारपूर तालुक्यात महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी कृषी विभागाचे आवाहन



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर - धनंजय पांढरे**
महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत महाराष्ट्र महिला शेतकरी सबलीकरण अधिनियम २०२६ अंतर्गत महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. बल्लारपूर तालुक्यातील जास्तीत जास्त महिला शेतकऱ्यांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी आकाश पवार यांनी केले आहे. महिला शेतकऱ्यांना विविध शासकीय योजना, अनुदाने आणि कृषीविषयक सेवांचा सहज लाभ मिळावा, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. महिला शेतकरी पोर्टलच्या माध्यमातून प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करता येणार असून, कृषी सल्ला, प्रशिक्षण व मार्गदर्शन, विमा, कर्ज तसेच इतर कृषीविषयक सुविधांचाही लाभ घेता येणार आहे.महिला बचत गट आणि शेतकरी संघटनांसाठीही विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.
अर्ज करण्याची प्रक्रिया सोपी असून, महिला शेतकऱ्यांनी महिला शेतकरी पोर्टलच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन अप्लाय नाऊ हा पर्याय निवडावा. त्यानंतर आधार क्रमांकानुसार नाव व जिल्हा निवडून मोबाईलवर प्राप्त झालेल्या डळढ द्वारे आधार पडताळणी करावी. पुढील टप्प्यात पत्ता, जात प्रवर्ग तसेच शेतीकामाचा प्रकार, जसे की पीक लागवड किंवा पशुपालन, याची माहिती भरावी. कुटुंबातील सदस्याचा फार्मर आयडी उपलब्ध असल्यास तो लिंक करून त्याची पडताळणी करावी. सर्व माहिती अचूक भरल्यानंतर सबमिट अप्लिकेशन या पर्यायावर क्लिक करून अर्ज सादर करता येणार आहे.
अर्ज करताना किंवा योजनेचा लाभ घेताना कोणतीही अडचण निर्माण झाल्यास सहायक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे कृषी विभागातर्फे कळविण्यात आले आहे. बल्लारपूर तालुक्यातील पात्र महिला शेतकऱ्यांनी या मोहिमेत सहभागी होऊन महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### नागपूर जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत राष्ट्रीय आदर्शचा मुलींचा संघ विजेता



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**
नागपूर जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा अंतर्गत २१ सप्टेंबरला जिल्हा परिषद शाळा अजनी (कामठी) येथे १४ वर्षीय मुलामुलींची कबड्डी स्पर्धा पार पडली. यात राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नवेगाव खैरीच्या खेळाडूंनी शिस्त, चिकाटी, धैर्य, चपळता आणि एकजुटीचे पालन करत १४ वर्षीय मुलींच्या संघाने सावनेर तालुक्यातील प्रतिस्पर्धी संघावर दणदणीत विजय मिळवून नागपूर जिल्ह्यातून विजेतेपद पटकावले.
यावेळी गौरी मेश्राम, त्रिवेणी सावरकर, त्रिशा सावरकर, मैना मैंद, पूर्वी कोहळे, आर्या कोहळे, लावण्या सिंदराम, सुजाता पनवारे या खेळाडूंनी विजयाचे श्रेय शाळेचे मुख्याध्यापक राजू बर्वे, मार्गदर्शक शिक्षक साक्षोधन कडबे, प्रशिक्षक मनीष राऊत, क्रीडा शिक्षक शैलेंद्र देशमुख, तालुका क्रीडा संयोजक रितेश मैंद, प्रा. मोहना वाघ, सतीश जुननकर, प्रा. अरविंद दुनेदार, दिलीप पवार, अमित मेश्राम, अनिल कोल्हे, राजू नरड, अर्चना येरखेडे आणि शाळेच्या समस्त शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दिले. अतिशय दुर्गम व आदिवासी भागातील खेळाडूंनी कठोर परिश्रमातून जिल्हास्तरावर प्राप्त केलेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आनंदराव देशमुख, सचिव मयंकराव देशमुख, कोषाध्यक्ष अंशुलराव देशमुख तसेच शालेय शिक्षण विभाग पारशिवनी तालुका, परिसरातील पालक वर्गातून व सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### महामार्ग पोलीस मदत केंद्राचे उद्घाटन, मृत्युंजय दूत पंकज चौधरींच्या धाडसाचे पोलीस अधीक्षकांकडून कौतुक



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
महामार्गावर प्रवाशांना तातडीची मदत मिळावी, तसेच अपघाताच्या घटनांमध्ये जखमींना वेळेत उपचार मिळावेत, या उद्देशाने महामार्ग पोलीस मदत केंद्राची सुरुवात करण्यात आली. आज, २२ सप्टेंबर रोजी महामार्ग पोलीस विभागाचे पोलीस अधीक्षक डॉ. लोहित मतानी यांच्या हस्ते मदत केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. दरम्यान, यावेळी अपघातग्रस्तांना वेळेत मदत पोहोचविणाऱ्या मृत्युंजय दूत पंकज चौधरी यांच्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले.
रामटेक येथे झालेल्या अपघातात बोरडा गणेशी, ता. पारशिवणी येथील महिला गंभीर जखमी झाल्या होत्या. घटनास्थळी उपस्थित असलेले मृत्युंजय दूत पंकज चौधरी यांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता पुढाकार घेतला. रुग्णवाहिकेची वाट न पाहता त्यांनी खासगी वाहन थांबवून जखमी महिलेला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, दुर्दैवाने रुग्णालयात नेत असतानाच मार्गात तिचा मृत्यू झाला. या प्रसंगी दाखविलेल्या तत्परता, धाडस आणि माणुसकीची दखल महामार्ग पोलीस अधीक्षक डॉ. लोहित मतानी यांनी घेतली. त्यांनी मृत्युंजय दूत तथा पत्रकार पंकज चौधरी यांच्या कार्याचे कौतुक करत पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. अपघाताच्या प्रसंगी मदतीसाठी पुढे येणे आणि जखमींना तातडीने वैद्यकीय उपचार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, ही सामाजिक जबाबदारीची जाणीव असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.
कार्यक्रमाला महामार्ग विभागीय पोलीस निरीक्षक नरेंद्र वानखेडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहासिनी सहस्त्रबुद्धे, मृत्युंजय दूत सुरेंद्र डडमल यांच्यासह महामार्ग पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

### नागपूरमध्ये 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र २०२६' चे आयोजन, महिला आणि पुरुषांसाठी रोजगाराची सुवर्णसंधी!

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** एल.ए.डी. आणि श्रीमती आर.पी. महिला महाविद्यालय, नागपूरच्या वतीने आगामी २९ सप्टेंबर २०२६ रोजी एका भव्य राज्यस्तरीय 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र, २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. शंकर नगर येथील महाविद्यालयाच्या प्रांगणात सकाळी ११ वाजल्यापासून या महामेळाव्याला सुरुवात होणार आहे. हा जॉब फेअर सर्व पुरुष आणि महिला उमेदवारांसाठी नोकरीच्या अनेकविध संधी घेऊन आला आहे. यात आदरातिथ्य (हॉस्पिटॅलिटी), इव्हेंट मॅनेजमेंट, मीडिया, कृषी आणि अन्न सुरक्षा, बँकिंग आणि फायनान्स, विज्ञान आणि तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान (बायोटेक्नॉलॉजी), किरकोळ विक्री (रिटेल) व ग्राहक सेवा, माहिती तंत्रज्ञान, BPO, प्रशासन, पायाभूत सुविधा, लाइफस्टाइल डिझायनिंग, पब्लिशिंग, रुग्णालय व वैद्यकीय सेवा तसेच समुपदेशन (काऊन्सेलिंग) यांसारख्या विविध क्षेत्रांतील नामांकित कंपन्या आणि रिक्रूटर्स सहभागी होणार आहेत.



**सहभागी होण्याचे आवाहन:** या रोजगार महामेळाव्यात सहभागी होण्यासाठी नियोक्ता आणि नोकरी शोधणारे या दोघांसाठीही नोंदणी पूर्णपणे मोफत आहे. हा जॉब फेअर सर्व नागरिकांसाठी खुला असून इच्छुकांनी या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पूजा पाठक यांनी केले आहे. या रोजगार महामेळाव्यात सहभागी होण्यासाठी नियोक्ता आणि नोकरी शोधणारे या दोघांसाठीही नोंदणी पूर्णपणे मोफत असून हा जॉब फेअर सर्व नागरिकांसाठी खुला आहे, अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पूजा पाठक यांनी दिली आहे. इच्छुक नियोक्त्यांनी अधिक माहितीसाठी डॉ. नंदिता साप्रा (९८२३४१२००८) किंवा डॉ. श्रीजा कुरुप (८०५५३३७३९३) यांच्याशी संपर्क साधावा.

# इंजि.चेतन बेले यांची वृद्ध कलावंत मानधन समितीवर तिसऱ्यांदा निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
युवा समाज प्रबोधनकार, सप्तखंजरी वादक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त इंजि. चेतन बेले यांची राजर्षी छत्रपती शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक वृद्ध कलावंत मानधन योजना, जिल्हा परिषद नागपूर या समितीवर सदस्य म्हणून तिसऱ्यांदा निवड झाली आहे.
पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार समितीची रचना करण्यात आली असून, चेतन बेले यांना पुन्हा एकदा या समितीवर संधी देण्यात आली आहे. यापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



यांनीही त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याची दखल घेत त्यांची समितीवर सदस्य म्हणून निवड केली होती.
चेतन बेले हे गेल्या अनेक वर्षांपासून सप्तखंजरीच्या माध्यमातून समाजप्रबोधन आणि जनजागृतीचे कार्य करीत आहेत. त्यांनी महाराष्ट्रातील हजारो गावांमध्ये कार्यक्रम सादर करून अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण तसेच विविध सामाजिक विषयांवर जनजागृती केली आहे.
त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याची दखल घेत त्यांना महाराष्ट्र शासनासह विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. कला आणि समाजप्रबोधन क्षेत्रात त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.
वृद्ध साहित्यिक व कलावंतांना शासनाच्या मानधन योजनेचा लाभ मिळवून देणे, पात्र कलावंतांच्या समस्या शासनाच्या निदर्शनास आणून देणे आणि योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी समितीच्या माध्यमातून काम करण्याची जबाबदारी चेतन बेले यांच्यावर राहणार आहे.
इंजि. चेतन बेले यांच्या या नियुक्तीबद्दल कामठी ग्रामीण भागातून माजी सभापती उमेशभाऊ रडके, कवी लीलाधर दवंडे, गजलकार ज्ञानेश्वर वांढरे, ह.भ. नरेश वाट, ह. भ. नामदेव दवंडे, ह. भ. बंडू भोयर, आदींनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

# १४ गावांतील पशुधनाला आरोग्याचे कवच, मेंढला पशु चिकित्सालयाची दमदार कामगिरी

## घरोघरी लसीकरण, वंध्यत्व तपासणी व उपचारासह २०४ किलो वैरण बियाण्यांचे वाटप, दूध उत्पादनात वाढ, परिसरात अनेक दूध संकलन केंद्रे सुरू

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड तालुक्यातील मेंढला येथील पशु चिकित्सालय श्रेणी-१च्या माध्यमातून परिसरातील पशुपालकांच्या हितासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत असून, त्याचा लाभ परिसरातील १४ गावांतील पशुपालकांना मिळत आहे. जनावरांचे आरोग्य उत्तम राहावे, पशुधनाचे संवर्धन व्हावे आणि पशुपालकांच्या उत्पन्नात वाढ व्हावी, या उद्देशाने तोंडखुरी व पायखुरी प्रतिबंधक लसीकरण, वंध्यत्व तपासणी व उपचार, वैरण बियाण्यांचे वाटप तसेच पशुपालकांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.
जनावरांना संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण मिळावे, यासाठी पशु चिकित्सालयाच्या माध्यमातून घरोघरी जाऊन लसीकरण करण्यात आले.



तोंडखुरी व पायखुरी आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक लसीकरणावर विशेष भर देण्यात आला. पशुपालकांच्या दारापर्यंत पशुवैद्यकीय सेवा पोहोचविण्यात आल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.
जनावरांमधील वंध्यत्वाच्या समस्यांवरही पशु चिकित्सालयाच्या माध्यमातून तपासणी व आवश्यक उपचार करण्यात येत आहेत. यामुळे पशुपालकांना जनावरांच्या प्रजननविषयक समस्यांवर वेळेवर उपचार मिळत असून पशुधन संवर्धनाला चालना मिळत आहे. जनावरांचे आरोग्य, संतुलित आहार, नियमित लसीकरण आणि योग्य पशुपालन पद्धतींबाबत पशुपालकांना मार्गदर्शनही करण्यात येत आहे.
मेंढला परिसरात दूध उत्पादनात वाढ झाली असून, पशुपालकांच्या सोयीसाठी परिसरातील विविध ठिकाणी दूध संकलन केंद्रे सुरू झाली आहेत. त्यामुळे दूध उत्पादकांना स्थानिक पातळीवर दूध विक्रीची सुविधा उपलब्ध झाली असून, दुग्धव्यवसायाला चालना मिळत आहे. पशुधनाचे आरोग्य आणि योग्य आहार यामुळे दूध उत्पादन वाढण्यास मदत होत असल्याचे चित्र परिसरात दिसून येत आहे.
पशुधनाला वर्षभर पौष्टिक चारा उपलब्ध व्हावा, यासाठी विविध प्रकारच्या वैरण बियाण्यांचे एकूण २०४ किलो वाटप करण्यात आले. वैरण उत्पादन वाढल्यामुळे जनावरांना पोषक आहार उपलब्ध होण्यास मदत होणार असून, त्याचा सकारात्मक परिणाम दुग्धोत्पादनावर होण्याची अपेक्षा आहे. पशुपालकांनी वैरण बियाण्यांचा योग्य वापर करून चारा उत्पादन वाढवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.
पशुधनाचे लसीकरण, वंध्यत्व तपासणी, उपचार, वैरण व्यवस्थापन आणि दुग्धोत्पादन वाढीसाठी मार्गदर्शन अशा विविध माध्यमातून पशु चिकित्सालयाकडून पशुपालकांना सेवा दिली जात आहे. ग्रामीण भागातील पशुपालकांच्या अर्थकारणात पशुधनाचे महत्त्व लक्षात घेता या उपक्रमांमुळे पशुपालकांना मोठी मदत होत आहे.
लसीकरण मोहिमेसाठी निरज डिग्रसकर, विक्की आंबिलडुके आणि तुषार घनश्याम अखंड यांनी सहकार्य केले. पशुपालकांनी आपल्या जनावरांचे नियमित लसीकरण करून घ्यावे तसेच आजाराची लक्षणे आढळल्यास तातडीने पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



मेंढला पशु चिकित्सालयाच्या कार्यक्षेत्रातील १४ गावांमध्ये पशुपालकांना वेळेवर पशुवैद्यकीय सेवा मिळावी, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. तोंडखुरी व पायखुरी प्रतिबंधक लसीकरणासोबतच घरोघरी जाऊन जनावरांची तपासणी, वंध्यत्व तपासणी व उपचार करण्यात येत आहेत. पशुपालकांनी जनावरांचे नियमित लसीकरण करून घेतल्यास अनेक आजारांपासून त्यांचे संरक्षण करता येते. तसेच संतुलित आहार व पौष्टिक वैरणीचा वापर केल्यास दुग्धोत्पादन वाढण्यास मदत होते. पशुपालकांचे आरोग्यदायी पशुधन आणि त्यातून त्यांचे उत्पन्न वाढविणे, हा पशुवैद्यकीय विभागाचा प्रमुख उद्देश आहे.
**- डॉ. हरिदास साबे,**
**सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, मेंढला**

थोडक्यात

## वेदिका इंगोलेचे तलवारबाजीमध्ये दुहेरी सुवर्णपदक

### नागपूर जिल्हास्तरीय स्पर्धेत चमकदार कामगिरी, विभागीय स्पर्धेसाठी निवड




**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा / दहेगाव रं.**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर यांच्या अंतर्गत आयोजित नागपूर जिल्हास्तरीय शालेय तलवारबाजी स्पर्धा २०२६-२७ मध्ये सेंट ॲन्स इंग्लिश मीडियम स्कूल, दहेगाव (रं.), ता. सावनेर, जि. नागपूर येथील इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी वेदिका खुशाल इंगोले हिने उल्लेखनीय कामगिरी करत दुहेरी सुवर्णपदक पटकावले. १४ वर्षांखालील मुलींच्या गटात वेदिका इंगोले हिने तलवारबाजीतील फॉईल आणि एपी या दोन प्रकारांत सुवर्णपदक मिळवून उत्कृष्ट कामगिरी केली. तिच्या या यशामुळे वेदिकाने स्वतःचे, आपल्या शाळेचे तसेच सावनेर तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

वेदिकाला प्रशिक्षक राहुल मांडवकर व मोनल बागडे यांचे प्रशिक्षण लाभत असून, सेंट ॲन्स इंग्लिश मीडियम स्कूलचे क्रीडा शिक्षक तथा क्रीडा विभागप्रमुख खुशाल इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली तिने हे यश संपादन केले. या उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे वेदिका इंगोलेची विभागीय स्तरावरील तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. आगामी ५ किंवा ६ ऑक्टोबर २०२६ रोजी भंडारा येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्पर्धेत ती नागपूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. वेदिकेच्या या यशाबद्दल नागपूर तलवारबाजी संघटनेचे सचिव मोहम्मद शोएब, सेंट ॲन्स इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या सिस्टर क्लिओफस, संवादिका सिस्टर सीरिया पुष्पम, उपमुख्याध्यापिका सिस्टर प्रीती, सिद्धार्थ माघाडे, प्रतीक उमक तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. वेदिका इंगोलेच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे सेंट ॲन्स इंग्लिश मीडियम स्कूलच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एका मानाच्या तुऱ्याची भर पडली आहे.

## दुचाकी चोरटा गजाआड, दुचाकी जप्त

### दहेगाव रंगारी परिसरातील घटना, एक दिवसाची पोलीस कोठडी

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

एका महिन्यांपूर्वी दुचाकी चोरी करणाऱ्या आरोपीला खापरखेडा पोलीस ठाण्यातील डीबी पथकाने दहेगाव रंगारी परिसरातून ताब्यात



घेऊन २१ सप्टेंबर सोमवार रात्री उशिरा अटक केली आहे २२ सप्टेंबर मंगळवारला न्यायालयात हजर केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे. प्राप्त माहिती नुसार रोहित उर्फ पप्पू निरंजन राने वय २७ रा टेकमा जिल्हा शिवणी मध्यप्रदेश असे अटक करण्यात आलेल्या दुचाकी चोरट्याचे नाव आहे. फिर्यादी गौरव शैलेंद्र खडसे रा दहेगाव रंगारी हनुमान मंदिर वार्ड क्रमांक ३ यांच्या आत्याचे सात वर्षांपूर्वी निधन झाले त्यांच्या नावे असलेली दुचाकी क्रमांक एमएच-४०-एएल-९०४१ फिर्यादी शैलेंद्र खडसे वापर करत होते २४ ऑगस्ट २०२६ रोजी दुचाकी घरी अंगणात ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरी केली होती यासंदर्भात खापरखेडा पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दाखल करण्यात आली होती.

तपासा दरम्यान साई मंदिर परिसरात एका घराचे बांधकाम करणाऱ्या एका मजुराने दुचाकी चोरी केल्याची माहिती डीबी पथकाला मिळाली माहितीच्या आधारावरून आरोपी रोहित राने याला ताब्यात घेतले पोलीस खाक्या दाखवताच दुचाकी चोरी केल्याची कबूली देऊन दुचाकी झाडीत लपवून ठेवल्याचे सांगितले. आरोपी रोहित राने याने दुचाकी चोरी केल्या पासून झाडीत लपवून ठेवली होती एकदोन दिवसात दुचाकी घेऊन पसार होणार होता मात्र पोलिसांच्या हाती लागला खापरखेडा पोलिसानी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून दुचाकी जप्त केली असून एक दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सचिन यादव पोलीस हवालदार संदीप सगणे, आशिष मेश्राम, बादल गिरी, शेखर वानखेडे कार्यवाही केली.

## दर्जेदार वीजसेवेसाठी वीजपुरवठा बंद, ग्राहकांना सहकार्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भविष्यात अधिक दर्जेदार, सुरक्षित आणि अखंडित वीजपुरवठा देण्याच्या उद्देशाने महापारेषणच्या बेसा येथील १३२ केव्हीच्या अतिउच्चदाब वीज वितरण केंद्रातील अत्यावश्यक दुरुस्ती व यंत्रणेच्या देखभालीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर बुधवारी, २३ सप्टेंबर रोजी महाल, सिव्हील लाईन्स आणि बुटीबोरी विभागातील काही भागांचा वीज पुरवठा तात्पुरता खंडित राहणार आहे. नागरिकांनी पूर्वसूचनेची दखल घेऊन आपल्या दैनंदिन कामांचे योग्य नियोजन करावे व सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे. या कामांमुळे महाल विभागातील गणेशपेठ, महाल, मॉडेल मिल, डी'मूर्ती आणि इमामवाडा परिसरातील ११ केव्ही वाहिन्यांवरील वीजपुरवठा सकाळी ९ ते ११ या वेळेत केवळ पुरवठा बदलण्याच्या प्रक्रियेदरम्यान अल्पशा कालावधीसाठी खंडित होईल, तर न्यू बाबुलखेडा, पार्वती नगर, कौशल्या नगर, कैलास नगर आणि जय भीम नगर या भागांत सकाळी ९ ते १२ या वेळेत वीज बंद राहील.

# मतदार यादीतील त्रुटी व सुनावणी प्रक्रियेबाबत सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ टप्पा-३ अंतर्गत जिल्ह्यातील मतदार यादीतील त्रुटी असलेल्या व मॅपिंग न झालेल्या मतदारांना नोटिसा बजावून त्यांची सुनावणी घेण्याबाबत १२ विधानसभा मतदारसंघांतील सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण आज पार पडले.

डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या प्रशिक्षणात नागपूर मध्यचे मतदार नोंदणी अधिकारी गणेश मरकड आणि रामटेक विधानसभा मतदार संघांचे मतदार नोंदणी अधिकारी प्रियेश महाजन यांनी सर्व सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. रचना इंदूरकर यांनी याबाबत विशेष सूचना दिल्या.

नागपूर जिल्ह्यात त्रुटी असलेल्या ४ लाख ४७ हजार ८७४ आणि मतदान केंद्राशी मॅपिंग न झालेल्या ४ लाख १८ हजार ०१२ मतदारांना नोटीस बजावून सुनावणीअंती आदेश पारित करण्याची कार्यवाही प्रशासनाने हाती घेतली आहे. ही संवैधानिक प्रक्रिया पार पाडण्यासाठी जिल्ह्यात एकूण ४ हजार ६०७ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आणि ४८९ सहायक मतदार नोंदणी अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. जिल्ह्यात एकूण ६३० ठिकाणी ही सुनावणी होणार असून, राजकीय पक्षांनी नियुक्त केलेल्या १५ हजार ४५२ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची मदत घेण्यात येणार आहे.

दरम्यान, १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम घोषित झाला आहे. ऑक्टोबर २०२४ नंतर पुनरीक्षण कार्यक्रम झाला नसल्याने १ ऑक्टोबर २०२४ नंतर वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांना यादीत नाव नोंदवता आले नव्हते. आता १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण झालेल्या सर्व नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदवण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

गैरहजर, स्थलांतरित किंवा अन्य कारणांमुळे नाव समाविष्ट करू न शकलेल्या नागरिकांना सध्याच्या रहिवासाच्या ठिकाणाहून नव्याने नाव समाविष्ट करण्यासाठी दावे व हरकती दाखल करता येतील.

दावे व हरकतींच्या कालावधीत २६ व २७ सप्टेंबर २०२६ रोजी सर्व मतदान केंद्रांवर सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० या वेळेत विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांमध्ये केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांसोबत मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी उपस्थित राहणार असून, याविषयीच्या सूचना सर्व अधिकाऱ्यांना आणि मान्यताप्राप्त व अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांना देण्यात आल्याची माहिती डॉ. रचना इंदूरकर यांनी दिली आहे.

## रामटेक येथे कोंबड्याच्या पिंजऱ्यात शिरला 'ब्राऊन कोब्रा', एक कोंबडीसह १२ पिल्लांना गिळले, सर्पमित्र सागर धावडे यांनी केले रेस्क्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक :** येथील किट्स कॉलेज रोडवरील आस्था नगरी भागात आज सकाळी एका घरात थरारक घटना घडली.



स्थानिक रहिवासी जगदीश आष्टनकर यांच्या राहत्या घरी असलेल्या कोंबड्याच्या पिंजऱ्यामध्ये आज, २२ सप्टेंबर रोजी सकाळी ७.०० वाजताच्या सुमारास एक विषारी 'ब्राऊन कोब्रा' (नाग) शिरल्याचे समोर आले. या नागने पिंजऱ्यातील एका कोंबडीला मारले आणि तब्बल १२ पिल्लांना जिवंत गिळंकृत केले. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी आष्टनकर कुटुंबाला कोंबड्यांच्या पिंजऱ्यातून असामान्य आवाज आले. त्यांनी जवळ जाऊन पाहिले असता, पिंजऱ्यात एक मोठा ब्राऊन कोब्रा दिसून आला. या सापाने पिंजऱ्यातील एका मुख्य कोंबडीला मारून टाकले होते, तर तिच्या १२ लहान पिल्लांना एकापाठोपाठ एक गिळले होते. पिंजऱ्यात नाग असल्याची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. आष्टनकर यांनी तातडीने स्थानिक सर्पमित्रांशी संपर्क साधला. माहिती मिळताच सर्पमित्र सागर धावडे यांनी तात्काळ घटनास्थळ गाठले. त्यांनी अत्यंत शिताफीने आणि काळजीपूर्वक त्या नागचा रेस्क्यू (बचाव) केला. सर्पमित्राने नागाला सुरक्षितपणे पकडल्याने आष्टनकर कुटुंब आणि परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला आहे. पकडलेल्या नागाला सुरक्षितपणे नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार असल्याचे समजते.

## बिटोलीत दोन कथित बोगस डॉक्टरांवर गुन्हे

### वैद्यकीय पदवी व नोंदणी नसतानाही ॲलोपॅथिक उपचार केल्याचा आरोप, साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या कथित बोगस डॉक्टरांविरोधात पारशिवनी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. तालुकास्तरीय बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समितीच्या आदेशानुसार २१ सप्टेंबर रोजी बिटोली येथे वैद्यकीय अधिकारी, पोलीस प्रशासन आणि औषध निरीक्षक यांच्या संयुक्त पथकाने छापा टाकला. या कारवाईत दोन जणांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रेमानंद बुधराम पारधे (वय ४७) आणि योगेंद्र बुधनलाल चौहान (वय ४५), दोघेही रा. बिटोली, ता. पारशिवनी, जि. नागपूर, हे कोणतीही वैद्यकीय अर्हता किंवा वैध नोंदणी प्रमाणपत्र नसताना मानवी आरोग्याशी खेळ करत अँलोपॅथिक वैद्यकीय व्यवसाय करीत असल्याची माहिती पथकाला मिळाली होती. त्यानंतर बनावट रुग्णाच्या माध्यमातून प्राथमिक खात्री करण्यात आली आणि संयुक्त पथकाने संबंधित ठिकाणी कारवाई केली.तपासणीदरम्यान दोन्ही आरोपींकडे वैद्यकीय पदवी अथवा नोंदणी प्रमाणपत्र आढळून आले नसल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. त्यांच्या क्लिनिकमधून ॲलोपॅथिक औषधे, सिरिंज, इंजेक्शन्स तसेच विविध वैद्यकीय साहित्य असा अंदाजे ३ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दोन्ही आरोपी स्वतःला नोंदणीकृत डॉक्टर म्हणून भासवून रुग्णांवर उपचार करीत असल्याचा आरोप असून, उपचाराच्या नावाखाली नागरिकांकडून पैसे घेतल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून दोन्ही आरोपींविरुद्ध संबंधित कायद्यांनुसार प्रत्येकी एक, असे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून, या प्रकरणाचा पुढील तपास पारशिवनी पोलीस निरीक्षक किशोर शेरकी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पांडे करीत आहेत. या कारवाईमुळे अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

## सर्व धर्मांचा सन्मान हाच विश्वशांतीचा आधार

### श्री गुरुदेव सेवा मंडळात विश्वशांती दिन उत्साहात, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांना उजाळा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**




सर्व धर्मांचा सन्मान, परस्परांमध्ये बंधुभाव आणि मानवतेची भावना जोपासणे हाच खऱ्या अर्थाने विश्वशांतीचा मार्ग आहे, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक यावले यांनी केले. श्री गुरुदेव सेवा मंडळ, सुभाष रोड, नागपूर च्यावतीने विश्वशांती दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. विश्वशांती दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाची सुरुवात वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या मानवतावादी विचारांचे स्मरण करून त्यांच्या कायार्ला अभिवादन केले. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना अशोक यावले म्हणाले की, जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी धर्म, जात, पंथ आणि प्रांत यांच्या पलीकडे जाऊन माणुसकीला केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे.

प्रत्येक धमार्चा आदर आणि सन्मान करण्याची वृत्ती समाजात रुजली, तर परस्परांतील गैरसमज दूर होऊन सामाजिक सलोखा आणि विश्वबंधुत्वाची भावना अधिक बळकट होईल. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते श्री. राजाभय्या हांडा यांनी विश्वशांती आणि पर्यावरण संवर्धन यांचा परस्पर संबंध स्पष्ट केला. पर्यावरणाचा समतोल राखणे ही केवळ निसगार्ची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. पर्यावरणाचे रक्षण केले तरच भावी पिढ्यांना सुरक्षित आणि शांततामय जीवन मिळू शकते, असे त्यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे अरुण वराडे यांनी आपल्या मार्गदर्शनातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांना उजाळा दिला.

ग्रामविकास, स्वच्छता, व्यसनमुक्ती, सामाजिक एकोपा आणि मानवसेवा यांसारख्या विषयांवर राष्ट्रसंतांनी दिलेला संदेश आजच्या काळातही तितकाच महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष विठ्ठलरावजी पुनसे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला श्री गुरुदेव सेवा मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने श्री गुरुदेव उपासक व नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी विश्वशांती, सामाजिक सलोखा आणि मानवतेच्या मूल्यांना बळ देण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे संचालन संस्थेचे सचिव राजेश कुंभलकर यांनी तर कोषाध्यक्ष दिलीप सुरकार यांनी उपस्थितांचे आभार मानले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा जागर आणि विश्वशांतीचा संदेश देत कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## सूरज येवले यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिवपदी नियुक्ती

### आंबेडकरी चळवळीतील सामाजिक कार्याची दखल, नियुक्तीनिमित्त मान्यवरांकडून सत्कार व शुभेच्छांचा वर्षाव

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



आंबेडकरी चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते आणि सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेले सूरजभाऊ येवले यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सूरज येवले यांनी आंबेडकरी चळवळीच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न, जनतेचे हक्क आणि वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम केले आहे. सामाजिक कार्याची ही पार्श्वभूमी लक्षात घेता काँग्रेस पक्षाने त्यांच्यावर प्रदेश सचिवपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे. या नव्या जबाबदारीच्या माध्यमातून संघटनात्मक कार्य अधिक प्रभावीपणे करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. नियुक्तीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करतांना येवले म्हणाले, देशातील हुकूमशाहीच्या विरोधात जनतेला न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी तसेच सत्ता परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करण्याच्या उद्देशाने आपण काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. आगामी काळात काँग्रेस पक्षाचे नेते निवडून आणण्यासाठी भक्कम मेहनत करू जनतेला न्याय मिळवून देतानाच त्यांच्या हक्कांसाठी सातत्याने प्रयत्नशील राहू, अशी भूमिका त्यांनी मांडली.

काँग्रेस पक्षाने सोपविलेल्या नव्या जबाबदारीच्या माध्यमातून पक्षाची विचारधारा आणि संघटनात्मक कार्य तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सामाजिक क्षेत्रातील अनुभवाचा उपयोग पक्षाच्या संघटनात्मक कामासाठी करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, सूरज येवले यांच्या नियुक्तीनिमित्त आयोजित सत्कार कार्यक्रमात सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी गिरीश पांडव, दिनेश तराळे, संजय शिंदे, चक्रधर बोढारे, सुरेश उके, राजीव माहूरे, निरंजन जांभुळे, विनय जगताप, रोहित बोरकर, हिमांशू सहारे, विकास नारायणे आदी मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. उपस्थितांनी त्यांच्या नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा देत आगामी काळात त्यांच्या माध्यमातून सामाजिक आणि संघटनात्मक कार्याला अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. सूरज येवले यांच्या नियुक्तीचे त्यांच्या सहकाऱ्यांनी, समर्थकांनी तसेच सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी स्वागत केले असून, त्यांच्या नव्या जबाबदारीकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

थोडक्यात

## नक्षी येथे आरोग्य तपासणी शिबिर, ९५ लाभार्थ्यांची तपासणी

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

श्री गणेशा आरोग्याचा अभियानांतर्गत नक्षी येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात गावातील महिला-पुरुष, शालेय विद्यार्थी तसेच गणेश मंडळाच्या सदस्यांनी सहभाग घेतला. शिबिरात रक्तदाब, रक्तातील साखर, एचआयव्ही यासह विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. एकूण ९५ लाभार्थ्यांनी शिबिराचा लाभ घेतला. यावेळी सरपंच अनिकेत वराडे, उपसरपंच राजेंद्र आदमने, डॉ. दीपाली चांदेकर, लॅब टेक्निशियन तृप्ती बोराडे, यादवी कुंभारे, आरोग्यसेवक पद्माकर भुते, आशा वर्कर सोनाली धांडे आणि PTA सीमा आदमने उपस्थित होते.

## धापल्र्यात आरोग्य तपासणी शिबिर, ५४ जणांची तपासणी



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

माझं गाव, आरोग्य संपन्न गाव आणि 'तिशीचा पल्ला तपासणी व सल्ला' मोहिमेअंतर्गत आयुष्यमान आरोग्य मंदिर, धापर्ला (वि.) येथे मंगळवारी (२२ सप्टेंबर) आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. सार्वजनिक बाल गणेश मंडळाच्या सहकार्याने आयोजित या शिबिरात ५४ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिराचे उद्घाटन सरपंच रत्नमाला धनविजय, उपसरपंच अभय ठवकर आणि ग्रामसेवक मंडपे यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी नागरिकांची रक्तदाब, रक्तातील साखर, कर्करोग, क्षयरोग, कुष्ठरोग तसेच विविध रक्त तपासण्या करण्यात आल्या. आवश्यकतेनुसार औषधोपचार आणि संदर्भसेवाही उपलब्ध करून देण्यात आली. उच्च जोखमीच्या गर्भवती महिलांना पुढील आपत्कालीन उपचारासाठी संदर्भित करण्यात आले.

किशोरवयीन मुला-मुलींसह अंगणवाडी व शालेय विद्यार्थ्यांचीही आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यांना आयएफए (लोह-फॉलिक ॲसिड) गोळ्यांचे वाटप करून आहार व आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम, वैयक्तिक स्वच्छता, पावसाळ्यात घ्यावयाची काळजी, असंसर्गजन्य आजार, क्षयरोग आणि कुष्ठरोग याबाबत यावेळी जनजागृती करण्यात आली. उपस्थितांनी आरोग्य दिन प्रतिज्ञाही घेतली. शिबिराच्या आयोजनासाठी सार्वजनिक बाल गणेश मंडळाचे अध्यक्ष आर्यन आत्राम यांच्यासह वैद्यकीय अधिकारी डॉ. केवल कोरडे, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. भावना जासुदकर, एएनएम कोयल नाईक आणि आशा कार्यकर्त्या कुसुम ढोणे यांनी विशेष सहकार्य केले.

## महिलेवर अत्याचार, नांद येथील आरोपीला २० वर्षे कारावास

### रस्ता अडवून शारीरिक संबंधाची मागणी, नकार देताच मारहाण करून अत्याचार

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

महिलेकडे वाईट नजरेने पाहायचे, तिचा रस्ता अडवायचा, शारीरिक संबंधाची मागणी करायची आणि नकार मिळताच बळाचा वापर करायचा, अशा विकृत मानसिकतेला न्यायालयाने चांगलाच दणका दिला आहे. नांद येथील किसना श्रीराम नंदुरकर (४०) याने शेतातून घरी जाणाऱ्या महिलेचा रस्ता अडवून मारहाण केली आणि लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक १८ चे न्यायाधीश जे. सी. यादव यांनी त्याला २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.

२८ फेब्रुवारी २०२४ रोजी लोणारा शिवारात ही घटना घडली. महिलेने शारीरिक संबंधास नकार दिल्यानंतर आरोपीने तिच्यावर हल्ला केला. मारहाणीत ती बेशुद्ध झाल्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे पोलिस तपासात समोर आले. या प्रकरणी भिवापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर तत्कालीन ठाणेदार जयप्रकाश निर्मल यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक संदीप सडमेक यांनी पुरावे गोळा करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. अखेर न्यायालयीन सुनावणीत आरोपी दोषी ठरला.

कलम ३७६ भादंविनुसार २० वर्षे सश्रम कारावास आणि २५ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास आणखी पाच वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. याशिवाय मारहाण व रस्ता अडविल्याप्रकरणीही स्वतंत्र शिक्षा आणि दंड ठोठावण्यात आला आहे. सरकारच्या वतीने एपीपी रश्मी खापर्डे यांनी बाजू मांडली. दोषसिद्धी कक्षाचे पोलिस निरीक्षक विशाल गिरी, सहायक पोलिस अधीक्षक तथा उपविभागीय पोलिस अधिकारी मयंक माधव, प्रभारी अधिकारी रविंद्र मस्कर, सहायक पोलिस निरीक्षक विशांत नांदगाये, पोलिस हवालदार रामदास कोराम आणि कोर्ट पैरवी अधिकारी पोउपनि तुलाराम खडसे यांनी खटल्यात योगदान दिले.

## नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघात २६ आणि २७ सप्टेंबरला विशेष मतदार नोंदणी शिबिरे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रांवर विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. ही शिबिरे २६ व २७ सप्टेंबर २०२६ या शनिवार व रविवारच्या दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० या वेळेत पार पडतील. कोणताही पात्र नागरिक मतदार नोंदणीपासून वंचित राहणार नाही, तसेच मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व सर्वसमावेशक व्हावी, या हेतूने हे विशेष अभियान राबवण्यात येत आहे. या शिबिरांमध्ये नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीतील नावांची दुरुस्ती, पत्ता बदल अथवा स्थलांतर, छायाचित्रातील दुरुस्ती यांसह आवश्यक बाबींसाठी नागरिकांना मार्गदर्शन व अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणारे पात्र युवक-युवती या शिबिराचा लाभ घेऊन मतदार म्हणून नाव नोंदवून घेऊ शकतील.

# महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी नागपूरच्या कुलगुरूपदी डॉ. ज्योती भाकरे

### पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी नियुक्ती, ३५ वर्षांचा शैक्षणिक व प्रशासकीय अनुभव

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूरच्या कुलगुरूपदाची सूत्रे प्रा. (डॉ.) ज्योती भाकरे यांनी स्वीकारली आहेत. विद्यापीठाचे कुलपती तथा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अतुल एस. चांदूरकर यांनी त्यांची पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी कुलगुरूपदी नियुक्ती केली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे MNLU नागपूरच्या शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्राला अनुभवी नेतृत्व लाभले आहे.

प्रा. (डॉ.) ज्योती भाकरे यांनी यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विधी शाखेत वरिष्ठ प्राध्यापक तसेच स्कूल ऑफ लॉच्या संचालक म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. त्यांना शैक्षणिक, प्रशासकीय आणि विधी क्षेत्रातील तब्बल ३५ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रभारी कुलसचिवपदाची जबाबदारीही पार पाडली आहे. तसेच विधी विभागप्रमुख आणि पुण्यातील नामांकित विधी महाविद्यालयांच्या प्रभारी प्राचार्य म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

प्रा.भाकरे यांचे विशेष प्रावीण्य विज्ञान, तंत्रज्ञान आणि कायदा, वैद्यकीय निष्काळजीपणा संबंधीचे न्यायप्रकरणे तसेच आरोग्यविषयक कायदे व धोरणे या क्षेत्रांत आहे. त्यांनी एलएल.एम. आणि पीएच.डी. या उच्च शैक्षणिक पदव्या संपादन केल्या आहेत. शैक्षणिक क्षेत्रात येण्यापूर्वी त्यांनी सात वर्षे वकिलीचा व्यावसायिक अनुभव घेतला आहे. त्यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. भारताच्या राष्ट्रपतींकडून नामनिर्देशित अभ्यागत प्रतिनिधी म्हणून त्यांनी अनेक केंद्रीय विद्यापीठांच्या कार्यकारी परिषदांवर जबाबदारी पार पाडली आहे. तसेच महाराष्ट्र शासनासाठी वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य विषयक धोरणांबाबत कायदेविषयक सल्लागार म्हणूनही त्यांनी काम केले आहे. प्रा.भाकरे या World Associatiob of Medical Lawच्या सदस्य असून त्यांनी अनेक संशोधकांना डॉक्टरेटसाठी मार्गदर्शन केले आहे. विधी, वैद्यकीय क्षेत्र आणि सार्वजनिक धोरण यांचा परस्परसंबंध असलेल्या विषयांमध्ये त्यांचे महत्त्वपूर्ण शैक्षणिक योगदान राहिले आहे. प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे यांनी पदभार स्वीकारल्या नंतर MNLU नागपूरच्या शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीबरोबरच संशोधन, विधी शिक्षण आणि संस्थात्मक विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

विद्यापीठाच्या शैक्षणिक वाटचालीला त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा लाभ होईल, अशी भावना विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थीवर्गातून व्यक्त करण्यात आली. दरम्यान, विद्यापीठाच्या कार्यवाहक कुलगुरूपदाची जबाबदारी सांभाळणारे प्रा. डॉ. व्ही. पी.तिवारी यांच्याकडून प्रा.भाकरे यांनी कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारली. टठछव नागपूरच्या विद्यापीठ परिवाराने प्रा.डॉ.ज्योती भाकरे यांचे स्वागत करून त्यांच्या कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## अल्पवयीन मुलाला वाहन देणे पालकाला पडले महागात!

### १३ वर्षे ११ महिन्यांच्या बालकाला वाहन चालवताना खापरखेडा पोलिसांनी पकडले, पालकाला ३० हजारांचा दंड




**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

अल्पवयीन मुलाच्या हातात वाहनाची चावी देणे एका पालकाला चांगलेच महागात पडले. खापरखेडा रेल्वे चौकी परिसरात पोलिसांच्या पेट्रोलिंगदरम्यान अवघ्या १३ वर्षे ११ महिन्यांच्या बालकाला वाहन चालवताना आढळून आले. या प्रकरणी वाहनचालकाच्या पालकावर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली असून, मा. न्यायालयाने संबंधित पालकाला ३० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

**पालकांनो, सावधान!**



अल्पवयीन मुला-मुलींना दुचाकी अथवा चारचाकी वाहन चालविण्यास देणे केवळ कायदेशीर कारवाईचे कारण ठरू शकत नाही, तर त्यातून गंभीर अपघाताची शक्यताही निर्माण होऊ शकते. वाहन चालविण्याचा अनुभव आणि कायदेशीर वय नसताना वाहन हाताळल्याने स्वतःच्या तसेच इतरांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो. जीवन बहुमूल्य आहे. अल्पवयीन मुले-मुली हे देशाचे भविष्य आहेत. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना योग्य वयात आणि योग्य वेळीच वाहन चालविण्याची परवानगी द्यावी. मुलांच्या हातात वाहनाची चावी देण्यापूर्वी त्यांच्या सुरक्षिततेचा आणि इतरांच्या जीविताचा विचार करावा, असे आवाहन खापरखेडा येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांनी नागरिकांना केले. मुलांना वाहन देण्यापेक्षा त्यांना योग्य संस्कार आणि सुरक्षिततेची जाणीव देणे अधिक महत्त्वाचे आहे, असेही खापरखेडा पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांनी सांगितले.

दिनांक ११ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी सुमारे ११.४५ वाजताच्या सुमारास खापरखेडा पोलिसांचे पथक पेट्रोलिंग करीत असताना रेल्वे चौकी, खापरखेडा येथे एक बालक वाहन चालवताना आढळून आले. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता त्याने आपले नाव, पत्ता आणि वय सांगितले. त्यानंतर बालकाच्या वयाची खात्री त्याच्या पालकांकडून करण्यात आली. पालकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वाहन चालविणाऱ्या बालकाचे वय १३ वर्षे ११ महिने असल्याचे निष्पन्न झाले. तसेच त्याच्याकडे वाहन चालविण्याचा कोणताही वैध परवाना नसतानाही पालकांनी त्याला वाहन चालविण्यास दिल्याचे समोर आले.

अल्पवयीन बालकाकडे वाहन चालविण्याचा परवाना नसल्याने पोलिसांनी संबंधित वाहन ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात जमा केले. त्यानंतर वाहन चालविण्यासाठी अल्पवयीन मुलाला परवानगी देणाऱ्या पालकाची जबाबदारी निश्चित करून पालक अमित रामनिवास दुबे यांच्याविरुद्ध मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम १९९(अ) अन्वये कारवाई करण्यात आली.

या प्रकरणात मा. न्यायालयाने संबंधित पालकाला ३०,००० रुपयांचा दंड ठोठावला. पालकाने न्यायालयात दंडाची संपूर्ण रक्कम भरल्यानंतर पोलिसांनी संबंधित वाहन परत केले.

## टीबी रुग्णांना राजेश रंगारी केअर फाऊंडेशनतर्फे प्रोटीनयुक्त आहाराचे वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, मिलिंद गाडेकर- कोराडी**

महादुला स्लम वस्ती श्रीवासनगर,जयभीमनगर,जवाहरनगर, फुलेनगर परिसरात काही प्रमाणात टीबी या रुग्णांना लागणारे प्रोटीनयुक्त आहार स्वतः राजेश रंगारी, माजी अध्यक्ष नगरपंचायत, महादुला तथा भाजपा नागपूर जिल्हा उपाध्यक्ष, यांनी त्यांचे पंचशील इमारतीमधील कार्यालयात सर्व लाभार्थींना आग्रहाने बोलाऊन सर्वांना प्रोटीन किट्स देण्यात आली. टीबी आजार कमी जेवन करणे, रोगप्रतिकार शक्ती कमी असणे लहानापासून प्रोटीनयुक्त पदार्थ खाऊ न मिळाल्याने हा आजार होतो. टी बी पेशंटने खोकताना नेहमी रुमाल तोंडाशी धरावा, कारण त्यांच्या खोकल्यामुळे जंतू आजूबाजूला असलेल्या लोकांच्या श्वासद्वारे इतरांना देखील त्यांची लागण होऊ शकते. म्हणूनच प्रोटीनयुक्त आहारच वेळीच घेतले आणि शासकीय हॉस्पिटलमधून डॉट्स हे प्रभावी औषध टीबी रोगावर आहे. ते शासकीय रुग्णालयात मिळते. वेळोवेळी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार घेत राहावे सोबतच डॉट्स टेबलेट्स देखील सुरू ठेवाव्यात असे यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश रंगारी यांनी उपस्थित टीबी लाभार्थ्यांना कौन्सिलिंग करतांना सांगितले. यावेळी राजेश रंगारी केअर फाऊंडेशनचे कार्यकर्ते मिलिंद उके, घनश्याम बोरकर, तारा शाहू यांनी या उपक्रमासाठी खूप परिश्रम केले.

# महावितरणचा महासंकल्प!

## १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर दरम्यान 'सेवा सेतू' व 'सेवा संकल्प अभियान'

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**





सर्वसामान्य नागरिकांना मिळणाऱ्या नागरी सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि गतिमान करणे, तसेच प्रलंबित घरगुती वीज जोडण्या आणि ग्राहकांच्या विविध तक्रारींचे तत्परतेने निवारण करणे या उद्देशाने महावितरणच्या वतीने १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा सेतू' आणि 'सेवा संकल्प अभियान' मोठ्या उत्साहात व व्यापक स्वरूपात राबवले जात आहे.

या अभियानांतर्गत महावितरणव्दारे पात्रतेनुसार प्रलंबित घरगुती वीज जोडण्यांना तातडीने मंजुरी दिली जात आहे. वीज जोडणीसाठी अर्ज केलेल्या पण तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणांमुळे रखडलेल्या ग्राहकांना यामुळे मोठा दिलासा मिळत आहे. याशिवाय ग्राहक किंवा मालमत्ताधारकांच्या तपशिलांचे अद्ययावतीकरण करण्याचे कामही या अभियानादरम्यान केले जात आहे. केंद्र व राज्य सरकारच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि लोककल्याणकारी सौर योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी महावितरणने कंबर कसली आहे. 'पीएम सूर्यघर मुफ्त बिजली योजना' अंतर्गत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व अर्जदारांना येणाऱ्या अडचणींचे निरकरण करून अर्ज भरण्यास मोफत सहकार्य केले जात आहे. तसेच 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजना' या शेतकरी बांधवांसाठी आखण्यात आलेल्या योजनेतील सर्व प्रलंबित अर्जांवर त्वरित आवश्यक ती कार्यवाही केली जत आहे. यासोबतच 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' अंतर्गत बळीराजाला आणि शेतीपंपांना दिवसा अखंड वीज पुरवठा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जलद गतीने कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

नागरिक आणि वीज ग्राहकांच्या दैनंदिन समस्या सोडवण्यासाठी अभियानात विशेष लक्ष दिले जात आहे. यामध्ये प्रामुख्याने वीज बिलावरील नावात बदल करणे, मंजूर वीज भार बदलणे, वीज बिलांविषयीच्या तक्रारी, नादुरुस्त मीटर किंवा सरासरी बिलिंग होणाऱ्या ग्राहकांच्या तक्रारींचे त्वरित निरसन करणे आणि विविध ग्रामपंचायती किंवा नागरिकांकडून प्राप्त झालेल्या अपघातजन्य ठिकाणांच्या अर्जांवर तातडीने उपाययोजना करणे यांचा देखील यात समावेश आहे. या शिबिरात प्राप्त सुचना व अर्जांच्या अनुषंगाने अपघातमुक्त व सुरक्षित वीज पुरवठ्यासाठी वीज यंत्रणेचे सुरक्षा ऑडिट केले जाणार आहे. लोंबकळणाऱ्या धोकादायक तारा सुव्यवस्थित करणे, वाकलेले विद्युत खांब सरळ करणे, रोहित्रांच्या उघड्या पेट्यांना झाकणे बसवणे आणि स्पेसर बसवण्याची व्यापक मोहीम हाती घेतली जाईल. तसेच नादुरुस्त रोहित्र विहित मुदतीत बदलून देण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल.

तालुका स्तरावर आयोजित शिबिरांमध्ये महावितरणकडून समर्पित स्टॉल्स व किऑस्क उभारले आहेत. या स्टॉल्सवर सहाय्यक अभियंता किंवा कनिष्ठ अभियंत्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. स्टॉलवर आलेल्या नागरिकांची जागेवरच ऑनलाईन अर्ज नोंदणी करून घेतली जात असून मोबाईल अप्लिकेशनचे थेट प्रात्यक्षिक आणि दृकश्राव्य चित्रफितींद्वारे योजनांच्या फायद्यांची माहिती दिली जात आहे. ग्राहकांना आर्थिक सहाय्य आणि कर्ज सुविधा सहज उपलब्ध व्हावी यासाठी स्थानिक बँक प्रतिनिधी आणि पॅनेलवरील अधिकृत विक्रेते शिबिरात उपस्थित राहून थेट मदत करीत आहेत. मंगळवारी (दि. २२ सप्टेंबर) या अभियानाला शहरातील तब्बल ५३ नागरिकांनी भेट दिली, त्यात 'पीएम सूर्यघर मुफ्त बिजली योजना' मध्ये सहभागी झालेल्या ११ ग्राहकांनी या योजनेबद्दल केंद्र शासन आणि महावितरणची प्रशंसा केली तर ५ ग्राहकांनी या योजनेत सहबागी होण्याची इच्छा व्यक्त करित नोंदणि केली. महावितरणच्या या लोककल्याणकारी महाअभियानात सर्व वीज ग्राहक, शेतकरी आणि नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे आणि आपल्या वीजविषयक समस्या सोडवून घेऊन सौर योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.



हेरंब उत्सव मंडळ, जामदार वाडा, महाल, नागपूर



सौरभ प्रदीप नंदनवार, हुडकेश्वर रोड, नागपूर



प्रतिक सुनील बाजड, विश्वकर्मा नगर, नागपूर

## दैनिक सिंहवाणी वृत्तचा 'आरती संग्रह घरोघरी'



दैनिक सिंहवाणी वृत्तर्फे प्रकाशित आरती संग्रह पुस्तिकेचे वितरण विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये निशुल्क करण्यात येत आहे. याच श्रृंखलेत दक्षिण नागपुरातील बालाजी नगर गणेशोत्सव मंडळ, हनुमान मंदिर पश्चिम येथे संघ स्वयंसेवक फडणवीस काका, महामंत्री नितीन कठाने, निलेश मासुरकर, अतुल बिवडे यांच्या उपस्थितीत पुस्तिकेचे वितरण करण्यात आले.

## दैनिक सिंहवाणी वृत्तचा 'आरती संग्रह घरोघरी'



दैनिक सिंहवाणी वृत्तर्फे प्रकाशित आरती संग्रह पुस्तिकेचे वितरण विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये निशुल्क करण्यात येत आहे. याच श्रृंखलेत दक्षिण नागपुरातील अर्जुना बाल गणेश उत्सव मंडळ, वाघमारे ले-आउट, न्यू ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड येथे पुस्तिकेचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रभाग ३३ च्या माजी नगरसेविका विशाखा शरद बांते यांच्यासह आशिष डेंगे, अर्जुन राघोते, नितीन कठाने, प्रभाग ३३ चे अध्यक्ष अतुल बिवडे, निलेश मासुरकर यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## दैनिक सिंहवाणी वृत्तचा 'आरती संग्रह घरोघरी'



दैनिक सिंहवाणी वृत्तर्फे प्रकाशित आरती संग्रह पुस्तिकेचे वितरण विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये निशुल्क करण्यात येत आहे. याच श्रृंखलेत दक्षिण नागपुरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेश (मामा) राऊत यांच्या उपस्थितीत भजन मंडळांना आरती संग्रहाचे वितरण करण्यात आले. यावेळी चंद्रकला रमेश राऊत, रेणुका राऊत, शिलाताई बुंधांदे, विमल शेंडे, भाग्यश्री इंगळे, ज्योती रायकवार, रेणुका बावणे, रेखा राहगडाळे, कमलाताई बावणे, वच्छला नेवारे, कमलाताई बावनकर, रजनी गिरडकर, कुसुम दुधकुरे तसेच भवानी महिला भजन मंडळाच्या इतर महिला सदस्य यांची उपस्थिती होती.

# भविष्यासाठी आयुर्वेद परंपरेतून आधुनिक आरोग्याकडे

आजच्या वेगवान जीवनशैलीत ताणतणाव, अनियमित आहार, अपुरी झोप, व्यायामाचा अभाव आणि वाढते प्रदूषण यामुळे जीवनशैलीशी संबंधित आजारांचे प्रमाण वाढत आहे. अशा परिस्थितीत आरोग्याकडे केवळ आजार झाल्यानंतर उपचार करण्याऐवजी प्रतिबंध, संतुलित जीवनशैली आणि निरोगी दिनचर्या या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. यासाठी आयुर्वेदाची भूमिका महत्त्वाची ठरते.

'स्वस्थस्य स्वास्थ्य रक्षणम्, आतुरस्य विकार प्रशमनम्' हा आयुर्वेदाचा मूलभूत दृष्टिकोन आहे. म्हणजेच निरोगी व्यक्तीचे आरोग्य टिकवणे आणि आजारी व्यक्तीच्या विकारांचे शमन करणे. दिनचर्या, ऋतुचर्या, योग्य आहार-विहार, योग, ध्यान आणि योग्य निद्रा यांसारख्या संकल्पना आजच्या आधुनिक जीवनातही उपयुक्त ठरू शकतात.



आयुवेर्दामध्ये प्रत्येक व्यक्तीची प्रकृती, वय, ऋतू, आहार-विहार आणि जीवनशैली यांचा विचार करून आरोग्य व्यवस्थापन करण्यावर भर दिला जातो. त्यामुळे 'एकच उपचार सर्वांसाठी' या दृष्टिकोनाऐवजी व्यक्तिनिष्ठ आरोग्यसेवेचा विचार पुढे येतो.

भविष्यातील आरोग्यव्यवस्था ही आधुनिक विज्ञान आणि पारंपरिक ज्ञान यांच्यातील योग्य समन्वयावर आधारित असणे गरजेचे आहे. संशोधन, आधुनिक निदानपद्धती, गुणवत्तापूर्ण औषधनिर्मिती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांच्या माध्यमातून आयुवेर्दाच्या ज्ञानाचा अधिक प्रभावी उपयोग करता येऊ शकतो.

आयुर्वेद म्हणजे केवळ औषधोपचार नव्हे; तर निरोगी जीवन जगण्याची एक समग्र जीवनपद्धती आहे. पुढील पिढ्यांसाठी निरोगी समाज घडवायचा असेल, तर आरोग्याचे संरक्षण, पर्यावरणपूरक जीवनशैली आणि भारतीय पारंपरिक ज्ञानाचा विवेकपूर्ण वापर यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

भविष्यातील आरोग्य हे केवळ आजारांवर उपचार करण्यात नाही, तर आजार टाळण्यासाठी आजपासून आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण्यात यावी.

भविष्यासाठी आयुर्वेद, निरोगी व्यक्ती, निरोगी समाज आणि निरोगी पर्यावरणाची दिशा!

"भूतकाळातील ज्ञान, वर्तमानातील विज्ञान आणि भविष्यातील निरोगी जीवन – हाच भविष्यासाठी आयुर्वेद!



**लेखिका**
**डॉ. शुभांगी मत्ते**

# 'सुधाकरपर्व': शैक्षणिक चळवळ, संघर्षाचा दस्तऐवज आणि समाज-शिक्षक मार्गदर्शक

'सुधाकरपर्व' हा केवळ एक विशेषांक किंवा गौरवग्रंथ नसून विदर्भातील शैक्षणिक चळवळीचा, शिक्षकांच्या न्याय्य हक्कांच्या संघर्षाचा आणि लोकप्रतिनिधीच्या कर्तव्यनिष्ठेचा एक जिवंत दस्तावेज आहे. नागपूर विभाग शिक्षक मतदारसंघाचे आमदार श्री. सुधाकर अडबाले यांच्या कार्यकाळातील शैक्षणिक, सामाजिक व संसदीय कामांचा सविस्तर लेखाजोखा या ग्रंथात मांडण्यात आला आहे. हा ग्रंथ केवळ भूतकाळातील कामांचा अहवाल नसून, तो शिक्षक वर्ग आणि संपूर्ण समाज या दोघांसाठी कसा अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक ठरतो, याचा विशेष विचार प्रस्तुत समीक्षेत केला आहे.

**१. पुस्तकाचा आशय आणि रचना:**

ग्रंथाची मांडणी अतिशय सूत्रबद्ध आणि अभ्यासपूर्ण आहे. यात आमदार सुधाकर अडबाले यांचा एका अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील बालकापासून ते शिक्षकांचा बुलंद आवाज बनण्यापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास रेखाटला आहे.

**पुस्तकातील प्रमुख घटक:**

संसदीय कामकाज: विधान परिषदेत उपस्थित केलेले तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना आणि विशेष उल्लेखांचे दिलेले तक्ते व आकडेवारी अडबाले सरांच्या अभ्यासू वृत्तीची साक्ष देतात.

**जुन्या पेन्शन योजनेचा लढा:** १ नोव्हेंबर २००५ नंतरच्या शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी मुंबईच्या आझाद मैदानापासून ते दिल्लीच्या रामलीला मैदानापर्यंत दिलेला लढा पुस्तकात ठळकपणे अधोरेखित केला आहे.

**'समस्या तुमच्या, पुढाकार आमचा':**

हा विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचा उपक्रम अत्यंत प्रभावी ठरला असून प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन शेकडो शिक्षकांचे प्रश्न 'ऑन द स्पॉट' सोडवल्याचे दाखले पुस्तकात आहेत.

**पुस्तकाचे नाव :** सुधाकरपर्व (२०२५-२०२६)
**संपादक / संकल्पना :** हितेश गोहोकार, प्रभाकर पारखी, डॉ. विजय हेलवटे
**प्रकाशक :** संपर्क कार्यालय, चंद्रपूर/नागपूर
**समीक्षक :** डॉ. कैलास निखाडे

**सहकार व सामाजिक योगदान:**

'नागपूर विभाग शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्थे'ची उभारणी करून ७५० कोटींपेक्षा जास्त टर्नओव्हर असलेली संस्था उभी करणे आणि कोरोनाकाळात मृत सभासदांचे १००% कर्ज माफ करणे, हा त्यांचा सहकार क्षेत्रातील क्रांतिकारी निर्णय पुस्तकातून समोर येतो.

**२. 'सुधाकरपर्व' ग्रंथाची शिक्षक आणि समाजासाठी उपयुक्तता:**

हा ग्रंथ केवळ वाचनापुरता मर्यादित नसून, शिक्षक आणि समाज या दोन्ही घटकांसाठी अत्यंत व्यावहारिक व दिशादर्शक आहे:

**शिक्षकांसाठी उपयोग**

प्रशासकीय व कायदेशीर हक्कांचे ज्ञान: शाळा, शालार्थ आयडी, तुकड्यांची मान्यता, वेतन आणि पेन्शनविषयक शासकीय नियम व शासन निर्णय कसे अभ्यासावेत आणि त्यांचा वापर कसा करावा, याचे प्रत्यक्ष उदाहरण शिक्षकांना या ग्रंथातून मिळते.

**संघटन आणि नेतृत्वाचे धडे:** शिक्षकांनी स्वतःच्या न्यायासाठी आणि हक्कासाठी सनदशीर मार्गाने लढा कसा उभारावा, रस्त्यावरील संघर्षापासून ते विधिमंडळातील मांडणीपर्यंतचा समतोल कसा साधावा, याचे वस्तुपाठ शिक्षकांना यातून मिळतात.

**आर्थिक साक्षरता व सहकार:** शिक्षक पतसंस्थेच्या माध्यमातून सहकाराची यशस्वी उभारणी कशी करावी आणि आपत्कालीन स्थितीत (उदा. कोरोना काळात) सहकाऱ्यांना कसा आधार द्यावा, याचे उत्कृष्ट मॉडेल शिक्षकांसमोर उभे राहते.



**समीक्षक**
**डॉ. कैलास निखाडे**

**समाजासाठी उपयोग:**

आदर्श लोकप्रतिनिधीचे प्रारूप: समाजातील नागरिक म्हणून लोकप्रतिनिधीकडून कोणत्या अपेक्षा ठेवाव्यात, आमदारांचे संसदीय उत्तरदायित्व काय असते आणि त्यांनी विधान परिषदेत जनतेचे प्रश्न कसे मांडावेत, याचे भान हा ग्रंथ समाजाला देतो.

**शैक्षणिक गुणवत्तेची जाणीव:** शाळा आणि शिक्षक मजबूत राहिल्यासच समाजातील भावी पिढी घडते. त्यामुळे शिक्षकांच्या समस्या सोडवणे म्हणजे अप्रत्यक्षपणे शिक्षण व्यवस्थेचा आणि समाजाचा दर्जा उंचावणे होय, ही व्यापक दृष्टी समाजाला मिळते.

**सामाजिक बांधिलकीची प्रेरणा:**

केवळ वैयक्तिक विकास न साधता, अपघातातील जखमींना मदत करणे किंवा आपत्तीत समाजघटकांच्या पाठीशी उभे राहणे यांसारख्या प्रसंगांतून सामाजिक संवेदनशीलतेचा वस्तुपाठ समाजातील तरुण पिढीला मिळतो.

**३. सकारात्मक बाजू व वैशिष्ट्ये:**

पारदर्शकता व पुरावे: पुस्तकात केवळ दाव्यांचा भडिमार न करता वृत्तपत्रांतील बातम्यांचे कात्रण, शासन निर्णय, विधिमंडळातील भाषणांचे क्यूआर कोड आणि छायाचित्रे समाविष्ट करून ग्रंथाची विश्वासार्हता वाढवली आहे.

**सोपी व प्रभावी भाषा:**

ग्रंथाचे संपादन प्रभाकर पारखी व हितेश गोहोकार यांनी अत्यंत सोप्या, प्रवाहित आणि वाचनीय भाषेत केले आहे.




**४. मूल्यमापन व निष्कर्ष**

'सुधाकरपर्व' हे पुस्तक केवळ एका लोकप्रतिनिधीच्या कामाचा अहवाल नसून, तो शिक्षकांसाठी मार्गदर्शक हस्तपुस्तिका आणि समाजासाठी लोकशाहीच्या मूल्यांची जाणीव करून देणारा दीपस्तंभ ठरतो.

शैक्षणिक क्षेत्रातील अभ्यासक, शिक्षक, संघटनांचे कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी आणि जागरूक नागरिक म्हणून काम करू इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी हे पुस्तक अत्यंत संग्राह्य, अभ्यासनीय आणि प्रेरणादायी आहे.

**– निसर्ग अभ्यासक फाउंडेशन अध्यक्ष व संस्थापक**

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : बुधवार, २३ सप्टेंबर २०२६

थोडक्यात

## पं. गोपाळराव वाडेगांवकर स्मृती संगीत समारोह २६ व २७ सप्टेंबरला

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दि ब्लाइंड रिलीफ असोसिएशन, नागपूर, पं. गोपाळराव वाडेगांवकर शिष्य परिवार आणि सप्तक यांच्या संयुक्त विद्यमाने पं. गोपाळराव वाडेगांवकर स्मृती संगीत समारोहाचे २६ आणि २७ सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. हा संगीत समारोह प्लॅटिनम ज्युबिली हॉल, दि ब्लाइंड रिलीफ असोसिएशन, दक्षिण अंबाझरी मार्ग, नागपूर येथे सायंकाळी ६ वाजता होणार आहे.

शनिवार, २६ सप्टेंबर रोजी सतार-तबला यांची जुगलबंदी होईल. यात सतारवादक डॉ. श्रीराम काणे आणि डॉ. उदय गुप्ते सहभागी होणार असून, तबल्यावर संदेश पोपटकर आणि विरथ वाडेगांवकर साथसंगत करणार आहेत. यानंतर गायक भुवनेश कोमकली यांचे गायन होणार असून, त्यांना संवादिनीवर श्रीकांत पिसे आणि आशय कुळकर्णी साथ देतील. रविवार, २७ सप्टेंबर रोजी सरोदवादक विवेक नवरे यांचे सरोदवादन होणार आहे. त्यांना तबल्यावर संदेश पोपटकर साथसंगत करतील. त्यानंतर पं. संजय मुखर्जी यांचे स्वतंत्र तबलावादन होणार असून, लहरा संगत हिरण्मोय मित्रा करणार आहेत. या निःशुल्क दोन दिवसीय संगीत समारोहाचा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

## आमगाव तालुक्यात मुसळधार पावसाची हजेरी

### मेघगर्जनेसह जोरदार सरी, नागरिकांना दिलासा, शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

आमगाव तालुक्यात मंगळवारी दुपारच्या सुमारास मेघगर्जनेसह मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून, गेल्या काही दिवसांपासून उकाड्याने त्रस्त नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. जोरदार सरींमुळे शहरासह ग्रामीण भागातील रस्त्यांवर काही ठिकाणी पाणी साचले. त्यामुळे वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सखल भागात पाणी साचल्याने नागरिकांना काही काळ अडचणींचा सामना करावा लागला.

दरम्यान, पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. खरीप पिकांसाठी हा पाऊस महत्त्वाचा मानला जात असून, पिकांना मोठा फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, मुसळधार पावसाचा जोर कायम राहिल्यास सखल भागातील पिके, नदी-नाले तसेच जलसाठ्यांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार विदर्भात पुढील काही दिवस पावसाचे वातावरण कायम राहण्याची शक्यता आहे. २३ आणि २४ सप्टेंबरदरम्यान विदर्भातील काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अनावश्यकपणे नदी, नाले किंवा पाण्याच्या प्रवाहाजवळ जाऊ नये, तसेच सखल भागातील नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## अखिल भारतीय काँग्रेस कमिटी ओबीसी विभागतर्फे जातिनिहाय जनगणनेची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटी ओबीसी विभागातर्फे केंद्र सरकारकडे ओबीसींची जातिनिहाय जनगणना या प्रमुख मागणी करीता 'ओबीसी के हक की हुंकार' या कार्यक्रम अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात जिल्ह्याचे ठिकाणी जिल्हाध्यक्ष प्रदेश पदाधिकारी व स्थानिक काँग्रेस ओबीसी नेते यांचे नेतृत्वात महामहीम राष्ट्रपती यांना जिल्हाधिकारीमार्फत निवेदन करण्यात आले.

नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये शहराध्यक्ष प्रशांत पवार यांचे नेतृत्वात काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते अतुल लोंढे, अजय हटेवार राष्ट्रीय समन्वयक ओबीसी काँग्रेस, मोरेश्वर भादे वरिष्ठ उपाध्यक्ष तथा समन्वयक नागपूर विभाग, उपाध्यक्ष भूषण तल्हार, संजय भिलकर, सचिन निंबार्ते, सचिन वैद्य, महासचिव चंद्रकांत हिंगे, विजयाताई धोटे, केवल मदनकर, प्रमोद शिंगणे, निखाडे, महेश श्रीवास, संध्या बसेन, वानखेडे, पाटील, प्रफुल भाजे, जगदीश जुमडे, चिलटे, महादेव दैने, महादेव गावंडे, संतोष गोटफोडे, आशिष काळे, नाईक यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले.

## धरमपेठ झोन अंतर्गत अनधिकृत ठेल्यावर गुन्हा दाखल कारवाई सुरू

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिका, धरमपेठ झोन क्र. ०२, अंतर्गत केलेल्या अतिक्रमण कारवाई व्हीएनआयटी रोड आणि सीताबर्डी पर्यंत धरमपेठ झोन अंतर्गत या ठिकाणी कारवाई करण्यात आली. आज घेतलेल्या एका मोठ्या अतिक्रमण विरोधी कारवाईत सार्वजनिक पदपथांवर बेकायदेशीर ताबा मिळवणाऱ्या विक्रेत्यांवर प्रशासनाने कडक कारवाई केली. पदपथांवर अनधिकृतपणे हातगाड्या (ठेले) लावून पादचाऱ्यांच्या मार्गात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी ८ विक्रेत्यांवर एफआयआरदाखल करण्यात आला आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी पदपथ मोकळे ठेवणे आवश्यक असून, नियम मोडणाऱ्यांवर अशीच कठोर कारवाई पुढेही सुरू राहील, असा इशारा अधिकाऱ्यांनी दिला आहे.

# नागपूर महानगरपालिका प्रशासन झोपले आहेत काय?

### प्रतापनगर चौकात रस्त्यावर कोसळली जाहिरातीची महाकाय कमान, मोठी जीवितहानी झाली असती तर जबाबदार कोण? ॲड. विनोद तिवारी यांचा संतप्त सवाल

**शहरातील रस्त्यांवरून जाणाऱ्या सर्व जाहिरात कमानींवर कायमस्वरूपी बंदी घाला, धोकादायक व अनधिकृत फलक तातडीने हटवा : ग्राहक भारतीची मागणी**



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरातील नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या धोकादायक जाहिरात कमानी, महाकाय फलक आणि रस्त्यावर लोंबकळणाऱ्या जाहिरात संरचनांविरुद्ध नागपूर महानगरपालिकेने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी कौन्सिल फॉर प्रोटेक्शन ऑफ राइट्स ग्राहक भारतीचे अध्यक्ष ॲड. विनोद तिवारी यांनी केली आहे.

प्रताप नगर चौक परिसरात आज दुपारी सुमारे अडीच वाजता रस्त्याच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूपर्यंत उभारण्यात आलेली मोठी जाहिरात कमान कोसळून थेट रहदारीच्या मार्गावर आली. त्या वेळी रस्त्यावर दुचाकी, मोटारी, रिक्षा आणि इतर वाहने सुरू होती. सुदैवाने मोठी जीवितहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही; परंतु काही क्षणांचा फरक पडला असता तर या घटनेचे रूपांतर गंभीर दुर्घटनेत झाले असते, असे तिवारी यांनी म्हटले आहे.

**मोठा अपघात झाल्यानंतरच महानगरपालिका जागी होणार काय?**

ॲड. विनोद तिवारी यांनी सवाल केला की, नागपूर महानगरपालिका आयुक्त आणि संबंधित अधिकारी एखाद्या निष्पाप नागरिकाचा बळी गेल्यानंतरच जागे होणार आहेत काय? भररस्त्यावर एवढी मोठी जाहिरात कमान उभारण्याची परवानगी कोणी दिली? परवानगी नसेल तर ती इतके दिवस उभी कशी राहिली? आणि परवानगी असेल तर तिच्या संरचनात्मक सुरक्षिततेची खात्री कोणी केली?

प्रताप नगरची घटना ही केवळ एक जाहिरात कमान पडल्याची किरकोळ घटना समजणे अत्यंत धोकादायक ठरेल. ही घटना नागपूरमधील मैदानी जाहिरात व्यवस्थेतील सुरक्षितता, परवानगी प्रक्रिया, तपासणी व्यवस्था आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी याबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारी आहे.

**रस्ता हा जाहिरातदारांची खासगी मालमत्ता नाही**

सार्वजनिक रस्ते हे नागरिकांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी आहेत. जाहिरात संस्थांच्या कमाईसाठी नागरिकांच्या डोक्यावर लोखंडी सांगाडे उभारण्याचा अधिकार कोणालाही देता येणार नाही.

रस्त्याच्या एका बाजूपासून दुसऱ्या बाजूपर्यंत जाणाऱ्या कमानी किंवा वाहतुकीच्या मार्गावर मोठ्या प्रमाणात झुकणाऱ्या संरचना वादळ, जोरदार वारा, अतिवृष्टी अथवा बांधकामातील दोषामुळे कोसळू शकतात. अशा संरचनांमुळे वाहतूक संकेत, दिशादर्शक फलक आणि चौकातील वाहने दिसण्यात अडथळा निर्माण होऊ शकतो. अचानक संरचना कोसळल्यास वाहनचालकांना ब्रेक लावावा किंवा मार्ग बदलावा लागून दुय्यम अपघातही होऊ शकतात.

रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि पोलिसांच्या आपत्कालीन वाहनांच्या हालचालीसुद्धा अशा अडथळ्यांमुळे बाधित होऊ शकतात.

**कलम २४४ व २४५ अंतर्गत कठोर कारवाई करा!**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम २४४ आणि २४५ तसेच लागू जाहिरात नियंत्रण नियमांनुसार महानगरपालिका प्रशासनाकडे जाहिराती व आकाशचिन्हांचे नियमन करण्याचे आणि नियमबाह्य किंवा धोकादायक जाहिरात संरचना हटविण्यासाठी कारवाई करण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे जाहिरातीचे शुल्क भरले आहे किंवा एखादी परवानगी घेतली आहे, एवढ्या कारणावरून नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या संरचनेला संरक्षण मिळू शकत नाही. महानगरपालिकेचे जाहिरात उत्पन्न हे नागरिकांच्या जीवापेक्षा मोठे असू शकत नाही, असे तिवारी यांनी स्पष्ट केले.

**प्रताप नगर प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करा!**

ॲड. तिवारी यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे प्रताप नगर घटनेची तातडीने चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यात संबंधित कमानीला महानगरपालिकेची अधिकृत परवानगी होती काय, ती कोणत्या जाहिरात संस्थेने उभारली, परवानगीचा कालावधी व मंजूर जागा कोणती होती, संरचनात्मक स्थैर्य प्रमाणपत्र घेण्यात आले होते काय, ते कोणत्या अभियंत्याने दिले, प्रत्यक्ष उभारणीनंतर महानगरपालिकेने तपासणी केली होती काय आणि वाहतूक सुरक्षिततेच्या दृष्टीने स्वतंत्र पडताळणी करण्यात आली होती काय, हे सार्वजनिक करावे. तसेच या प्रकरणाशी संबंधित परवानगीपत्र, संरचनात्मक स्थैर्य प्रमाणपत्र, तपासणी अहवाल व इतर अभिलेख तातडीने सुरक्षित ठेवावेत, जेणेकरून नंतर कोणतीही कागदपत्रे गायब किंवा बदलल्याचा संशय निर्माण होणार नाही. नियमांचे उल्लंघन अथवा निष्काळजीपणा आढळल्यास संबंधित जाहिरात संस्था तसेच जबाबदार महानगरपालिका अधिकाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करण्यात यावी.

**संपूर्ण नागपूरमध्ये विशेष सुरक्षा मोहीम राबवा**

एकाच प्रताप नगर चौकापुरती कारवाई करून महानगरपालिकेने विषय संपवू नये. शहरातील प्रमुख चौक, वाहतूक संकेतस्थळे, उड्डाणपुलांचे प्रवेशमार्ग, वर्तुळे, अरुंद रस्ते, पादचारी मार्ग आणि गर्दीच्या परिसरातील सर्व मोठे जाहिरात फलक, कमानी आणि तात्पुरत्या जाहिरात संरचनांची तातडीने तपासणी करण्यात यावी. अनधिकृत, असुरक्षित, वाकलेली, कमकुवत किंवा वाहतुकीला अडथळा निर्माण करणारी प्रत्येक संरचना कायदेशीर प्रक्रियेनुसार तातडीने हटविण्यात यावी.

**रस्त्यावरून जाणाऱ्या व्यावसायिक जाहिरात कमानींवर संपूर्ण बंदी घाला**

प्रताप नगरच्या घटनेनंतर नागपूर महानगरपालिकेने शहरव्यापी स्पष्ट धोरण स्वीकारण्याची वेळ आली आहे. सक्रिय सार्वजनिक रस्त्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाणारी कोणतीही व्यावसायिक जाहिरात कमान, फलकाला आधार देणारी संरचना किंवा वाहनांच्या मार्गावर कोसळू शकणारी जाहिरात रचना यापुढे परवानगीयोग्य नसावी, अशी ग्राहक भारतीची मागणी आहे.

## सातबारा तिच्या नावावर नसला तरी, 'ती'ला मिळणार शेतकरी असल्याचा मान!

### आता शेतमजूर नव्हे, महिला शेतकरी म्हणून मिळणार अधिकृत ओळख, प्रमाणपत्रामुळे कर्ज, विमा आणि कृषी सेवांचा मार्ग होणार सुलभ!

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

सकाळी शेतात जाण्यापासून ते पेरणी, निंदणी, कापणी आणि शेतमालाची देखभाल करण्यापर्यंत, शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांचा मोठा वाटा असतो. मात्र जमीन त्यांच्या नावावर नसल्याने अनेक महिलांची ओळख कागदोपत्री शेतकरी म्हणून निर्माण होत नव्हती. आता हीच परिस्थिती बदलण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.



महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत प्रत्यक्ष शेती आणि शेतीपूरक व्यवसायात सहभागी असलेल्या महिलांना अधिकृत महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, केवळ जमिनीची मालकी हा शेतकरी ओळखीचा निकष राहणार नाही; महिलेचा शेतीतील प्रत्यक्ष सहभाग महत्त्वाचा ठरणार आहे.

**मग कोणाला मिळू शकते ही ओळख?**

जमीन स्वतःच्या नावावर नसली तरी शेती करणाऱ्या महिलांसोबतच पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन, फलोत्पादन, बीजोत्पादन यांसारख्या शेती व शेतीपूरक व्यवसायात प्रत्यक्ष सहभागी महिलांनाही या प्रक्रियेत समाविष्ट केले आहे. भूमिहीन, भाडेपट्ट्याने किंवा बटाईवर शेती करणाऱ्या महिलांसाठीही तरतुदी आहेत.

**प्रमाणपत्र का महत्त्वाचे?**

महिला शेतकरी म्हणून अधिकृत ओळख मिळाल्यानंतर पात्र महिलांना शासकीय कृषी योजना, कृषी कर्ज, पीक विमा, कृषी निविष्ठा आणि कृषी विस्तार सेवा मिळविणे अधिक सुलभ होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. तसेच महिला शेतकऱ्यांचा अधिकृत डेटाबेस तयार करण्याची तरतूदही अधिनियमात आहे.

**उमरेडमध्ये कृषी अधिकाऱ्यांकडून माहिती**

या नव्या उपक्रमाबाबत उमरेडच्या तालुका कृषी अधिकारी दीक्षिता तिरमारे यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी महिला शेतकरी म्हणून कोण पात्र ठरू शकतात, प्रमाणपत्रासाठी कोणती पूर्तता करावी लागेल आणि प्रमाणपत्र मिळाल्यानंतर महिलांना कोणते लाभ मिळू शकतात, याबाबत सविस्तर माहिती दिली.

महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्जाची सुविधाही कृषी विभागाने उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे शेतीत प्रत्यक्ष योगदान देणाऱ्या महिलांनी या संधीची माहिती घेऊन आपल्या पात्रतेनुसार प्रमाणपत्रासाठी नोंदणी करण्याकडे लक्ष देणे महत्त्वाचे ठरणार आहे.

शेतात राबणाऱ्या हातांना आता कागदावरही मिळणार शेतकरी म्हणून ओळख, महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हे नवे पाऊल किती महिलांच्या आयुष्याला दिशा देते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## लोकसंवादच्या माध्यमातून शासकीय योजनांचा जागर

### कामठी येथे जिल्हा माहिती कार्यालयाचा उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती नागरिकांपर्यंत थेट पोहोचवण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे आयोजित लोकसंवाद- २०२६ या विशेष उपक्रमांतर्गत कामठी येथे आज घेण्यात आलेल्या कार्यक्रमांमधून नागरिकांनी शासकीय योजनांचा लाभ घेण्याची प्रक्रिया समजावून घेत चांगला प्रतिसाद दिला. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून राज्यभरात दि १६ ते २४ सप्टेंबर दरम्यान लोकसंवादाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नागपूर जिल्हा माहिती कार्यालयाकडून कामठी क्षेत्रात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

नवयुवक श्री हरदुलाल बाबा गणेशोत्सव मंडळ परिसरात कामठीचे नायब तहसीलदार महेश चौबे व संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती दिली. यात गरीब व गरजूंना परवडणारी घरे उपलब्ध करून देणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजनेचा समावेश होता. अर्ज प्राप्त करण्यापासून तर योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेले निकष व संपूर्ण प्रक्रिया त्यांनी उपस्थितांना सांगितली. आरोग्यविषयक योजनांचा लाभ देणारे आयुष्मान कार्ड मिळवण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. नागरिकांनी या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. गणेशोत्सव समितीचे अध्यक्ष राजुभाऊ तुप्पट, कार्याध्यक्ष चंद्रशेखर तुप्पट, उपाध्यक्ष गणेश लोन्दासे, सचिव दुर्गेश थोटे, कोषाध्यक्ष गणेश सायरे, सहसचिव रोहित तुप्पट व विशू सहारे, सहकोषाध्यक्ष गणेश तुप्पट, स्वप्नील सायरे व अंकित मुल यांच्यासह क्रीडा, महाप्रसाद, पूजन, सोशल मीडिया आणि स्वच्छता समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषी उत्पन्न बाजार समितीची सर्वसाधारण सभा संपन्न

### एकुण ५०१ बक्षीसांचे लकी ड्रा व्दारे वाटप

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

कृषी उत्पन्न बाजार समिती सावनेर व्दारे दि. २२ सप्टेंबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत सर्वसाधारण सभा व बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या या वार्षिक सर्वसाधारण सभा व प्रोत्साहनपर बक्षीस वितरण समारंभ सुनीलबाबु केदार माजी मंत्री महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली श्यामकुमार बर्वे खासदार रामटेक लोकसभा क्षेत्र, मुक्ताताई कोकर्डे माजी अध्यक्षा नागपुर जिल्हापरिषद, अनुजा केदार अध्यक्षा ना. जी. सह. सूतगिरणी पाटनसावंगी, माजी जिल्हापरिषद सभापती अवंतीका ताई लेकुरवाळे, नीतीन राठी माजी उपाध्यक्ष जिल्हापरिषद नागपुर, शेषराव रहाटे मिजी उपाध्यक्ष ना.जी.प.,गोविंदा ठाकरे माजी सभापती पंचायत समिती सावनेर, राहुल तिवारी माजी उपसभापती प.स. सावनेर, प्रकाश पराते माजी उपसभापती प.स.सावनेर आदिंच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. सर्वसाधारण सभे नंतर बक्षीस वितरण सोहळ्यात पहिले बक्षीस १) एँक्टीवा दुचाकी, २) विडर रोटावेटर (पेट्रोल मॉडल, ३)मिनी पावर ट्रेलर (पेट्रोल), ४) टोटण यंत्र, ५) दहा बक्षीस सोलर झटका मशीन, ६) विस पावर स्प्रे, ७) बैलावरची तीफन, ८) बैलावरचे





सारणी यंत्र, ९) बँटरी स्प्रे पंप, १०१,१०) तारपत्री १०१,११) प्लास्टिक कँरेट, १२) बकेट, १३)ब्लँकेट, १४) किसान टार्च, १५) दुध कँन,१६) टिफिन बाँक्स असे सर्व मिळून ५०१ बक्षिसाचे वितरण लकी ड्रा द्वारे करण्यात आले.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवींद्र चिखले यांनी आपल्या प्रस्ताविकातुन अहवाल वाचन केले. तर आयोजनाचे संचालन प्रविण झाडे यांनी तर उपस्थितांचे आभार उपसभापती प्रकाश लांजेवार यांनी मानले.

आयोजनची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिपपँरज्वलन करुण तसेच सहकार महर्षि स्व. बाबासाहेब केदार यांच्या प्रतिमेचे पुजन व मल्यार्पण करुण करण्यात आली.सोबतच मागील वर्षात दिवंगत झालेल्या शेतकरी बांधवांच्या आकस्मिक निधनावर दोन मिनिटं मौन पाळुन सामुहिक श्रद्धांजली वाहण्यात आली.

**कृषी प्रदर्शनीला हजारो शेतकऱ्यांनी दिली भेट**

याप्रसंगी भव्य कृषी प्रदर्शनी व मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात कुृषी विषयक उत्पादने, बी-बियाणे, औषधी, खते, साहित्य, फळ भाज्या आदिंचे शेकडो स्टॉल उभारण्यात आले. या मेळाव्याची मान्यवरां सोबतच उपस्थित हजारो शेतकरी बांधवांनी पाहाणी करुण मोठ्याप्रमाणात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुण तयार करण्यात आलेले शेतीउपयोगी साहित्य खरीदी केले.तर सदर कृषी मेळाव्यात स्थानिक सेंट्रल बायोटेक कंपनीच्या स्टॉलवरील साहित्यांना भरपूर प्रतीसाद देत असल्याचे निर्दशनास आले.